# ‘दावोस दौऱ्यामुळे महाराष्ट्रातील सर्वच भागात गुंतवणूक’

**दावोस :** महाराष्ट्राने वर्ल्ड इकोनॉमी फोरमध्ये ६१ करार केले. त्यात १५ लाख ७० हजार कोटींची



गुंतवणूक राज्यात आली. १६ लाख रोजगार निर्मिती होणार आहे. इन्फ्रास्क्ट्रक्चर, ग्रीन एनर्जी, सोलार, फायनान्स, लॉजेस्टिक, इंटरटेनमेंट, आयटी, स्टील, डेटा सेंटर, शिक्षण, संरक्षण, ऑटो, इलेक्ट्रिक, ड्रोन मॅन्युफॅक्चरिंगसह अनेक क्षेत्रातील करार करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील सर्वच भागात ही गुंतवणूक येणार आहे. MMR विभागात जवळपास सहा लाख कोटींच्या गुंतवणुकीचे करार करण्यात आले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राच्या सगळ्याच क्षेत्रात चजण झालेत. विदर्भात पाच लाख कोटी गुंतवणुकीचे करार, उत्तर महाराष्ट्रात ३०–३५ हजार कोटींचे गुंतवणूक करार झालेत. मॅन्युफॅक्चरिंगमध्ये मराठवाडा नवीन क्षेत्र म्हणून विकसित होतेय.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १८९
www.ramprahar.com

शुक्रवार, २४ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


पनवेलहून निघणार ‘विश्व शांती परिक्रमा’/५

जेएनपीएमध्ये प्रकल्पांचे उद्घाटन, भूमिपूजन/६

नमो चषक स्पर्धेच्या शुभारंभाची चित्रझलक/८


# शिवाजी पार्कच्या धर्तीवर उलवे नोडमध्ये शिवसृष्टी उभारणार -लोकनेते रामशेठ ठाकूर



## नमो चषक स्पर्धेला शानदार सुरुवात

**उलवे नोड (लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरी) : रामप्रहर वृत्त**

**शिवाजी पार्क व आझाद मैदान हे राज्याच्या दृष्टिकोनातून मुंबईतील अत्यंत महत्त्वाची अशी स्थान आहेत. या दोन्ही स्थळांना अनन्य साधारण महत्त्व आहे. असेच राज्यातील आणखी एक महत्वाचे स्थान पनवेल उरणसाठी उलवे नोडमध्ये व्हावे, यासाठी या ठिकाणी शिवाजी पार्कच्या धर्तीवर मैदान आणि शिवसृष्टी उभारणार असल्याची ग्वाही माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी (दि.२३) उलवे नोड येथे ‘नमो चषक २०२५’ भव्य क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यावेळी केले.**

### ज्या ठिकाणी रामशेठ ठाकूर त्या ठिकाणी यश –बाळासाहेब पाटील

लोकनेते रामशेठ ठाकूर हे मनाने मोठे असलेले नेते आहेत. त्यांच्या रूपाने व्हिजन असलेला नेता आपल्या सर्वांना मिळाला आहे. लोकांसाठी काम करणारा आत्मा त्यांच्याकडे आहे. या ठिकाणी सुंदर क्रीडानगरी या स्पर्धेच्या निमिताने निर्माण झाली आहे. अटल करंडक, नमो चषक, उत्सव तसेच इतर पंतप्रधानांच्या सन्मानार्थ कार्यक्रमे सातत्याने आयोजित करून स्फूर्ती निर्माण करत असतात. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर यांच्याकडून या बाबी शिकण्यासारख्या आहेत. मी अनेक कार्यक्रमांना गेलो आहे पण भव्य दिव्य आयोजन काय असते ते या महोत्सवातून दिसत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून खेळ आणि खेळाडूंची विशेष काळजी घेण्यात आली आहे. दोनवेळा नाश्ता आणि दोन्हीवेळा जेवण देण्याबरोबरच इतर सुविधाही खेळाडूंना या ठिकाणी उपलब्ध करून दिल्या आहेत आणि हे खेळाडूंच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे असे आहे. अटल सेतूवरून येता–जाताना शिवसृष्टीच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन होणार आहे. ज्या ठिकाणी रामशेठ ठाकूर त्या ठिकाणी यश आणि त्यामुळे त्यांच्या शब्दावर लाखो मते आहेत, असे कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांनी या वेळी सांगितले.

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल व उरणच्या वतीने २३ ते २५ जानेवारीपर्यंत उलवा नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या पाठीमागील बाजूच्या मैदानावर अर्थात लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरीत आयोजित करण्यात आलेल्या या नमो चषकाचे ढोलताशा लेझीम, फटाक्यांची आतषबाजी आणि हजारो खेळाडू आणि क्रीडा रसिकांच्या साक्षीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या शानदार उद्घाटन हस्ते झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या ठिकाणी असलेल्या अटल सेतूवरून जाणाऱ्या प्रत्येक माणसाला छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट दर्शन होईल, त्या अनुषंगाने महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारणार असल्याचेही त्यांनी या वेळी अधोरेखित केले.

या वेळी पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी, कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख **(पान २ वर..)**

## मशिदींवरील भोंग्यांबाबत हायकोर्टाचा पुन्हा दणका

**मुंबई : प्रतिनिधी**

**नियमांचे उल्लंघन झाल्यास लाऊडस्पीकर होणार जप्त**

मुंबई उच्च न्यायालयाने मशिदींवरील बेकायदेशीर भोंग्यांबाबतच्या याचिकेवर सुनावणी करताना गुरुवारी (दि.२३) ऐतिहासिक निकाल दिला आहे. डेसिबल पातळीचे उल्लंघन आणि ध्वनीप्रदूषण मर्यादेबाबत सर्वोच्च न्यायालय आणि हायकोर्टाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न केल्याबाबतच्या याचिकेवर हायकोर्टाने हा निकाल दिला.

जेव्हा ध्वनिप्रदूषणाबाबत पहिली तक्रार दाखल केली जाते तेव्हाच पोलिसांनी तत्काळ दखल घेत उल्लंघन करणाऱ्याला ध्वनिप्रदूषण नियमांचे उल्लंघन केल्याची माहिती द्यावी. उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध दुसरी तक्रार दाखल न्यायालयाने उल्लंघनास कारणीभूत असलेले लाऊडस्पीकर काढून टाकण्याचे आणि जप्त करण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत. निकालाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे निर्देशही राज्य सरकारला दिले आहेत.

## चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा खून; व्हिडिओही काढला

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. खराडी परिसरात पतीने पत्नीचा खून केल्याचे समोर आले आहे. इतकंच नव्हे तर पतीने पत्नीच्या खूनाचा व्हिडिओदेखील काढला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संपत्तीच्या वादातून पतीने पत्नीवर कात्रीने वार केले. त्यातच तिचा मृत्यू झाला. पत्नीच्या मृत्यूनंतर पतीने खूनाचा व्हिडिओ तर काढलाच पण खून करून स्वतः पोलीस ठाण्यातदेखील हजर झाला. या प्रकरणी पोलिसांनी खराडी पोलीस ठाण्यात पतीविरोधात गुन्हा दाखल करून घेतला आहे.

पतीचा पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. यातूनच त्याने तिचा खून केल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. तसंच, पत्नीने प्रॉपर्टी हडप केल्याचा संशयदेखील पतीचा होता. त्यातून त्याने हे टोकाचे पाऊल उचलले आहे. आरोपी पतीने पत्नीवर कात्रीने गळ्यावर वार केले. त्यात ती गंभीर जखमी झाली होती. त्यानंतर शेजाऱ्यांनी धाव घेत तिला रुग्णालयात दाखल केले होते, मात्र उपचारांपूर्वीच तिचा मृत्यू झाला. पत्नीचा खून करुन पती स्वतःच पोलिसांसमोर हजर झाला. शिवदास गिते असे आरोपीचे नाव आहे.

## निवडक

### निवृत्त लष्करी जवानाकडून पत्नीची क्रूरपणे हत्या

**तेलंगणा :** हैदराबादमधील रंगारेड्डी जिल्ह्यातील एका निवृत्त लष्करी जवानाने आपल्या पत्नीची हत्या करून तिच्या मृतदेहाचे तुकडे केले आणि नंतर ते प्रेशर कुकरमध्ये शिजवून तलावात टाकल्याचे कबूल केले आहे. दरम्यान, महिलेच्या आई–वडिलांनी त्यांच्या बेपत्ता मुलीचा शोध घ्यायला सुरुवात केल्यानंतर हा गुन्हा उघडकीस आला आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विद्यार्थ्यांशी संवाद

**नवी दिल्ली :** नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संसद परिसरात शाळकरी मुलांशी संवाद साधला. या वेळी पंतप्रधान आणि मुलांमध्ये प्रश्नोत्तरासह चर्चा झाली. दरम्यान, पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना हवामान बदलाचा सामना करण्यासाठी पंतप्रधान सूर्य घर योजनेबद्दल समजावून सांगितले. इलेक्ट्रिक वाहनांमुळे इंधनावरील खर्च व प्रदूषण कमी होईल, असेही ते म्हणाले.

## ग्राहकांकडील मोबाईलनुसार वेगवेगळे दर आकारणाऱ्या ओला, उबरला नोटीस




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकाच सेवेसाठी आयफोन आणि अँड्रॉइड स्मार्टफोनवर ग्राहकांना वेगवेगळे दर आकारणीप्रकरणी केंद्र सरकारने कॅब ॲग्रीगेटर्स ओला आणि उबर यांना नोटीस बजावली आहे.

ग्राहकांना एकाच राईड्ससाठी वेगवेगळे भाडे आकारले जात असल्याचा दावा करणाऱ्या वृत्तानंतर आता कंपन्यांना खुलासा करावा, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. याबाबतची माहिती केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी शेअर केली आहे.

उबर आणि ओला कंपनी ग्राहकांना आयफोन किंवा अँड्रॉइड डिव्हाइस वापरत असलेल्या स्मार्टफोनवर वेगवेगळे भाडे आकारत असल्याचे दिसून आल्याचा वृत्ताची ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने दखल घेतली आहे. दोन्ही कंपन्यांना बजावलेल्या नोटीसत म्हटले आहे की, सीसीपीएने कंपन्यांना त्यांच्या किंमत पद्धती स्पष्ट करावी. तसेच संभाव्य भेदभावाबाबतही खूलासा करावा. भाडे आकरणीतील पारदर्शकता आणि निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी तपशीलवार माहिती सादर करावी.

काही दिवसांपूर्वी दिल्लीमधील एका उद्योजकाने वेगवेगळ्या मोबाईल फोनमधील डिव्हाइसेसची भाड्यांची तुलना करणारी पोस्ट X वर शेअर केली होती. त्यांनी उबर ॲपवर एका विशिष्ट ठिकाणासाठी वेगवेगळे भाडे दाखवणारे दोन फोनचा फोटो शेअर केल्यानंतर हे प्रकरण चर्चेत आले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतली पनवेलमधील १० क्षयरुग्णांची जबाबदारी

### राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण जनजागृती कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभाग व खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन सीकेटी महाविद्यालयात करण्यात आले. या वेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी महापालिकेकडे नोंद झालेल्या क्षयरुग्णांपैकी १० रुग्णांची जबाबदारी स्वत: घेत असल्याचे घोषित केले.

ते म्हणाले की, क्षयरोगाला कायमस्वरूपी संपविण्यासाठी व्यापक जन मोहिम (मास कॅम्पेन) उभारावी लागेल. यासाठी आपण क्षयरोग निक्षय मित्र झाले पाहिजे. आर्थिकदृष्ट्या कमकवुत असणाऱ्या रूग्णांच्या पाठीशी आपण उभे राहून त्यांची जबाबदारी घेऊ.



कार्यक्रमावेळी एम. जी. एम रुग्णालय कळंबोलीचे रेस्पिरेटरी मेडिसिन्स प्रमुख डॉ. प्रदीप पोतदार, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, चांगू काना ठाकूर महाविद्यालय प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, माजी आरोग्य सभापती डॉ. अरुणकुमार भगत, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, राष्ट्रीय सेवा योजना विभाग मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. एन. परकाळे उपस्थित होते.

एम. जी. एम रुग्णालय कळंबोलीचे रेस्पिरेटरी मेडिसिन्स प्रमुख डॉ. प्रदीप पोतदार यांनी या वेळी क्षयरोगाची लक्षणे, क्षयरोग होण्यास कारणीभूत घटक, क्षयरोगावरील उपचार याबाबत मार्गदर्शन केले. **(पान २ वर..)**

## भारताच्या लेकींनी वर्ल्डकपमध्ये नोंदवला सलग तिसरा विजय

### श्रीलंकेचा मोठा पराभव; उपांत्यपूर्व फेरीत मारली धडक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

१९ वर्षाखालील टी–२० वर्ल्डकपमध्ये भारतीय संघाने श्रीलंकेच्या महिला संघाचा पराभव करत सलग तिसरा विजय नोंदवला आहे.

या सामन्यात टीम इंडियाने श्रीलंकेविरुद्ध केवळ ११८ धावा केल्या होत्या, पण तरीही त्यांना सहज विजय मिळाला. भारताने श्रीलंकेचा संघ अवघ्या ५८ धावांवर रोखला आणि ६० धावांनी आणखी एक मोठा विजय नोंदवला. टीम इंडिया अ गटात सलग तीन सामने जिंकून अव्वल स्थानावर राहिली आणि सुपर ६ लीग टप्प्यासाठी पात्र ठरली आहे. दुसरीकडे या स्पर्धेत श्रीलंकेच्या संघाने पहिलाच सामना गमावला आहे. हा संघही सुपर सिक्समध्ये पोहचला आहे.

श्रीलंकेच्या संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. फक्त गोंगाडी त्रिशाच्या ४९ धावांच्या खेळीवर भारताने या सामन्यात मजबूत आघाडी मिळवली. त्रिशाने ५ चौकार आणि एक षटकार लगावला. तिच्या या खेळीमुळे टीम इंडियाने ११८ धावांपर्यंत मजल मारली. श्रीलंकेकडून लिमांसा तिलकरत्ने आणि प्रमुदी मथासराने २–२ विकेट घेतले.

भारताने श्रीलंकेला अवघ्या ११९ धावांचे लक्ष्य दिले होते, पण भारतीय गोलंदाजांच्या भेदक गोलंदाजीसमोर श्रीलंकेने पार गुडघे टेकले. शबनम शकील आणि जोशिता यांनी मिळून श्रीलंकेच्या टॉप ऑर्डरला सुरूंग लावला. शकील आणि जोशिता या दोघींनी २–२ विकेट घेतल्या. आयुषी शुक्लाला एक विकेट मिळाली.

## श्रीवर्धनमध्ये बांधकाम विभागाचा लाचखोर अधिकारी जेरबंद



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील एक महत्त्वपूर्ण लाचलुचपत प्रकरण उघडकीस आले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी (दि.२३) एक रंगेहात सापळा रचला, ज्यामध्ये बांधकाम विभागातील उप अभियंता डॉ. प्रवीण पंढरीनाथ मोरे यांना लाच घेताना पकडले.

तक्रारदार यांना श्रीवर्धन तालुक्यातील एका सभागृहाच्या बांधकामासाठी ७,००,००० रुपयांचे कंत्राट २०२३–२४ या आर्थिक वर्षात मिळाले होते. काम पूर्ण झाल्यानंतर समाजकल्याण विभागाकडून १,४०,००० रुपयांचे बिल मंजूर झाले, परंतु संबंधित कार्यकारी अभियंता कडून या बिलाची मंजूरी मिळवण्यासाठी आरोपी डॉ. प्रवीण मोरे यांनी तक्रारदाराकडून १३,००० रुपये लाचेची मागणी केली.

तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागात २२ जानेवारी २०२५ रोजी तक्रार केली, ज्यावर तपास करून विभागाने तडजोडीअंती १०,००० रुपये लाच स्वीकारताना आरोपीला २३ जानेवारी २०२५ रोजी रंगेहात पकडले. लाच स्वीकारताना आरोपीला पंच साक्षीदारांच्या उपस्थितीत रंगेहात पकडण्यात आले. आरोपीवर लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे.

रायगड जिल्ह्यातील नागरिकांना हे आवाहन करण्यात येते की, जर कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने लाचेची मागणी केली किंवा त्यांच्या वतीने एखाद्या एजंटने लाच मागितली, तर त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

## पिंपरी चिंचवडमध्ये गुईलेन बॅरे सिंड्रोमचे आठ रुग्ण

**पुणे :** पिंपरी–चिंचवडमध्ये गुईलेन बॅरे सिंड्रोमचे ८ रुग्ण आढळलेले आहेत. आठ रुग्णांमधील तीन रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. शहरातील मोरेवाडी पिपंळे गुरव आदी परिसरातील रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. आठ रुग्णांपैकी महापालिकेच्या वायसीएममध्ये एक संशयित आणि दोन जणांना लागण झालेली आहे. त्यातील दोन रुग्ण ठणठणीत बरे झालेत आहेत. गुईलेन बॅरे सिंड्रोम हा दुर्मीळ आजार आहे. हा आजार रोगप्रतिकारक शक्ती कमी करते. सुरुवातीला हाता पायाला झिणझिण्या येतात. स्नायू कमकुवत होतात. छातीचा स्नायू कमकुवत झाल्याने श्वास घेण्यास अडथळा येतो. शरीराला लकवा मारू शकतो, पण हा लकवा काहीकाळापुरता असल्याचे माहिती मिळाली आहे. या आजारांवर लवकरात लवकर उपचार केले नाहीतर, या आजार गंभीर होऊ शकतो.




**पनवेल : पाली देवद, विचुंबे व शिवकर ग्रामपंचायत आणि शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमाणपत्र वितरण व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत यांची उपस्थिती लाभली. या वेळी माजी जि.प.सदस्य अमित जाधव, माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे आदी उपस्थित होते.**

# आदिवासींच्या प्रश्नांवर राजकारणापलीकडे विचार व्हावा - राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन

**मुंबई : प्रतिनिधी**

आदिवासींच्या प्रश्नांवर राजकारणापलीकडे विचार झाला पाहिजे. विकसित भारत म्हणजे सर्वसमावेशक विकास. विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावले पाहिजे. यासाठी सर्व लोकनियुक्त प्रतिनिधींनी प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.



राज्यातील नवनियुक्त आदिवासी खासदार व आमदारांचा सत्कार राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या हस्ते बुधवारी (दि. २२) सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र प्रांतांतर्फे नवनियुक्त आदिवासी खासदार व आमदारांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रपती भवन येथे झालेल्या राज्यपालांच्या परिषदेत आपण आदिवासी विकासविषयक उपसमितीचे अध्यक्ष होतो असे सांगून आदिवासी विकासाकडे विशेष लक्ष्य देण्यासाठी राजभवन येथील आदिवासी कक्ष पुनरुज्जीवित करण्यात आला असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

राज्यात आदर्श आदिवासी गाव विकसित केले जात असून त्याठिकाणी निवासी संकुल, शाळा, आरोग्यकेंद्र, समाजमंदिर, शॉपिंग कॉम्प्लेक्स आदी सुविधा असतील. याशिवाय नाशिक येथे स्वतंत्र आदिवासी विद्यापीठ निर्माण केले जाणार असून तेथे आयआयटी दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय व एम्सच्या धर्तीवर वैद्यकीय महाविद्यालय उभारले जाईल. या विद्यापीठातील ८० टक्के जागा केवळ आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राखीव राहतील. आपण लवकरच राज्यातील आदिवासी गावांना भेट देणार असून अति आदिम समाजाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

या वेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी राज्यातील प्रत्येक विद्यापीठात आदिवासी मुला-मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यासाठी जागा देण्यात यावी, अशी मागणी केली. वनहक्क कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी तसेच कातकरी समाजाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले जावे, अशी अपेक्षा डॉ. उईके यांनी व्यक्त केली.

यावेळी वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष सत्येंद्र सिंह यांनी लोकशाही, पंचायत, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण रक्षण याबाबतीत आदिवासी जीवनशैली समाजाला मार्गदर्शक असल्याचे सांगितले. आदिवासी आमदारांनी आपल्या समाजाच्या समस्या पक्षाच्या व्यासपीठावर तसेच विधानमंडळात जोरकसपणे मांडाव्या, असे त्यांनी सांगितले. आमदारांनी निवडून आलेल्या आपल्या भागात पाच वर्षे विकास पुरुष होऊन कार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाला अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आश्रमाच्या कोकण प्रांताचे अध्यक्ष विष्णू सुरूम, ऑलिम्पिक स्पर्धेतील धावपटू कविता राऊत तुंगार तसेच नवनियुक्त आदिवासी आमदार उपस्थित होते. यावेळी राज्यातील १७ आदिवासी आमदारांचा सत्कार करण्यात आला.

राज्यपालांच्या हस्ते सर्व आमदार राजेश पाडवी, काशीराम पावरा, केवलराम काळे, राजू तोडसाम, दिलीप बोरसे, हरिश्चंद्र भोये, आमश्या पाडवी, मंजुळाताई गावित, चंद्रकांत सोनावणे, राजेंद्र गावित, नितीन पवार, दौलत दरोडा, डॉ. किरण लहामटे, शांताराम मोरे, भीमराव केराम, नरहरी झिरवाळ व डॉ. अशोक उईके यांचा सत्कार करण्यात आला.

## कर्जत स्थानकातील दोन्ही तिकिट खिडक्या खुल्या

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत स्थानकातील फलाट एक वर असलेल्या तिकीट खिडक्यापैकी एक खिडकी कायम बंद असते. त्याबाबत कर्जत पॅसेंजर असोसिएशनकडून आवाज उठवण्यात आल्यावर वाणिज्य प्रबंधक यांच्याकडून तत्काळ कार्यवाही करण्यात आली आहे.

मागील काही दिवसांपासुन कर्जत रेल्वे स्थानकातील मुख्य दोन तिकिट खिडक्यांपैकी एका तिकिट खिडकीवर केवळ ऑनलाईन प्रणालीद्वारेच तिकीट वितरीत केले जात होते. त्यात रोखीने (कॅश) तिकीट घेणारे प्रवासी देखील त्याच लाईनमध्ये तिकीट घेण्यासाठी उभे राहत होते. त्यामुळे तिकीट खिडकी जवळ प्रवासी तिकीट घेण्यासाठी आल्यानंतर प्रवाशांना काही समजून येत नव्हते. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे दिसून येत होते.त्या खिडकीवर केवळ ऑनलाईन (क्यु आर) प्रणालीद्वारेच तिकीट मिळेल. त्याचा परिणाम तेथे रांगेत उभ्या असलेल्या त्या प्रवाशांना पुन्हा दुसऱ्या तिकीट खिडकीवर लाईन मध्ये उभे राहुन तिकिट घ्यावी लागत होती.

मध्य रेल्वेचे या चुकीचे धोरणामुळे प्रवाशांना नाहक शारीरिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत होते. सदर बाब कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनने कमर्शियल इन्स्पेक्टर शिरीष कांबळे यांच्या निदर्शनास आणुन देण्यात आली.

कमर्शियल इन्स्पेक्टर शिरीष कांबळे यांनी सदर समस्येबाबत दखल घेऊन गर्दीच्या वेळी प्रत्यक्ष पाहणी करून सदर समस्येबाबत माहिती घेतली. कर्जत रेल्वे स्थानकातील दोन्ही तिकीट खिडकीवर रोखीने (कॅश) व ऑनलाईन (क्यु आर) प्रणालीद्वारे तिकीट वितरीत केले जाऊ लागले आहे. कमर्शियल इन्स्पेक्टर शिरीष कांबळे यांनी प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीची गंभीरतेने दखल घेऊन प्रवाशांना तिकीट काढतेवेळी होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक त्रासापासुन सुटका केली.

# अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबईमध्ये आधुनिक स्वदेशी रोबोटिक सर्जरी प्रणाली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबईने भारतातील पहिली स्वदेशी रोबोटिक सर्जरी प्रणाली, एसएसआय मंत्र प्रस्तुत करून आरोग्य सेवेमध्ये आणखी एक मानक स्थापित केले आहे. ही स्वदेशी रोबोटिक सर्जरी प्रणाली प्रोस्टेट, मूत्राशय आणि किडनी, गर्भाशय, गर्भाशयाचे मुख (सर्विक्स), हृदय, पोट आणि ईएनटीच्या सर्वात गुंतागुंतीच्या सर्जरीसाठी प्रगत उपाय प्रदान करेल.

देशातील हे पहिले असे रुग्णालय आहे ज्याने प्रोस्टेट, किडनी आणि मूत्राशयाच्या कँसरच्या रुग्णांवर उपचारांसाठी २६०० पेक्षा जास्त रोबोटिक सर्जरी पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. प्रगत रोबोटिक सर्जिकल सिस्टीमसह पारंपरिक सर्जरीच्या सीमा रुंदावल्या आहेत, ज्यामुळे या क्षेत्रात समर्पित प्रशिक्षित तज्ञ तयार झाले आहेत. आता नवी मुंबईमध्ये एसएसआय मंत्र लॉन्च करून या रुग्णालयाने सुलभ व अचूक सर्जिकल पर्याय देणारे, रोबोटिक सर्जरीमध्ये आघाडीचे म्हणून आपले स्थान अधिक मजबूत केले आहे.



४० पेक्षा जास्त रोबोटिक एंडो-सर्जिकल उपकरणांसह सर्जन युरॉलॉजी, गायनॅकोलॉजी, कार्डिओलॉजी आणि सामान्य सर्जरीमध्ये गुंतागुंतीच्या केसेस सोडवू शकतात. कमीत कमी इन्वेसिव प्रक्रियांना सक्षम करून, ही सिस्टिम रिकव्हरीला लागणारा वेळ कमी करते, उपचार वेगाने होऊ शकतात, वेदना व सर्जरीच्या खुणा कमी होतात आणि संसर्गाचा धोका कमी होतो. याची मॉड्युलर मल्टी-आर्म सिस्टिम, ३२-इंच 3D 4K मॉनिटर आणि एर्गोनॉमिक डिझाईन अचूकता, नियंत्रण आणि सुरक्षा सुनिश्चित करते.

ही एक टॉप टर्शियरी केयर फॅसिलिटी आहे जी आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम प्रथांना अनुसरून वैद्यकीय देखभाल प्रदान करते. प्रगत मेडिकल तंत्राचे पालन करण्यात आघाडीचे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या रुग्णालयाने नवी मुंबई आणि आजूबाजूच्या क्षेत्रांमध्ये सर्वोत्तम आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी क्षितिजे सातत्याने विस्तारली आहेत आणि रुग्णांना सर्वश्रेष्ठ आरोग्य सेवा प्रदान केली आहे. या रोबोटिक सर्जरी सिस्टीमचे लॉन्च रुग्णालयाच्या क्षमतांमध्ये महत्त्वपूर्ण वृद्धी दर्शवते, जे युरॉलॉजी, गायनॅकॉलॉजी, कार्डिओलॉजी, गॅस्ट्रोएंटरोलॉजी, सामान्य सर्जरी इत्यादींमध्ये गुंतागुंतीच्या केसेससाठी अचूक सर्जरी करणे संभव बनवते. आपल्या मेड इन इंडिया तंत्रासह रुग्णांना रोबोटिक सर्जरीमध्ये जागतिक प्रगतीचे लाभ स्थानिक स्तरावर सहजपणे उपलब्ध होत राहावेत.

हॉस्पिटलचे कार्यकारी संचालक डॉ. संतोष शेट्टी यांनी आमच्या नवी मुंबईतील रुग्णालयामध्ये भारतातील पहिली स्वदेशी रोबोटिक सर्जरी प्रणाली सुरू करून, आम्ही आमच्या रुग्णांच्या फायद्यासाठी नवनवीन गोष्टींचा उपयोग करून घेण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येते.

पान १ वरून

## शिवाजी पार्कच्या धर्तीवर उलवे नोडमध्ये शिवसृष्टी उभारणार -लोकनेते रामशेठ ठाकूर

नमो चषकाचे मुख्य आयोजक व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शहा, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, दीपक अहुजा, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, तालुका क्रीडा अधिकारी मानकर, तालुका गटशिक्षण अधिकारी सिताराम मोहिते, उरण गटशिक्षण अधिकारी प्रियंका पाटील, शिक्षण अभियंता अभिजित मटकर, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, अमरीश मोकल, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, जीवन गावंड, कामगार नेते सुरेश पाटील, सुधीर घरत, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, तालुका अध्यक्षा कमला देशेकर, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, अॅड. मनोज भुजबळ, विकास घरत, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, नीता माळी, वर्षा नाईक, वृषाली वाघमारे, मोनिका महानवर, न्हावे सरपंच विजेंद्र पाटील, विश्वनाथ कोळी, जयवंत देशमुख, डॉ. संतोष आगलावे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, उलवे नोड अध्यक्ष अमर म्हात्रे, उलवे १ अध्यक्ष निलेश खारकर, उलवे २ अध्यक्ष विजय घरत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, क्रीडा प्रशिक्षक विनोद नाईक, दिनेश खानावकर, योगिता भगत, सुधीर ठाकूर, धीरज ओवळेकर, तेजस जाधव, वितेश म्हात्रे, गौरव नाईक, गौरव कांडपिळे, नितेश पाटील यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले की, देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या नमो चषकाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव प्रत्येकाच्या मनाला आनंद देणारा आहे. ही स्पर्धा अतिशय मेहनत घेऊन होत आहे. २०१७-१८ सालापासून या मैदानावर आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य अश्वारूढ पुतळा उभारणी आणि विविध कार्यक्रमे, सभा व इतर सार्वजनिक कार्यक्रमांसाठी मैदान व्हावे, यासाठी सतत पाठपुरावा आम्ही करत आलो आहोत. २६ जानेवारी २०२० रोजी गव्हाण ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत मुंबईच्या शिवाजी पार्क सारखे एक मैदान उलवे नोडमध्ये तसेच माझ्या म्हणजेच रामशेठ ठाकूर यांच्या नावाने हे मैदान निर्माण व्हावे असा प्रस्ताव काँग्रेस नेते महेंद्र घरत यांनी मांडला आणि त्याला ग्रामस्थांनी अनुमोदन दिले.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यासाठी व मैदानासाठी सिडकोने जमीन देण्याचे कबूल केले आहे. या जमिनीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारुढ पुतळा उभारण्यासाठी जो काही खर्च येईल तो मी करायला सहमती दिली आहे आणि या सर्व कामासाठी २५ ते ३० कोटी रुपये खर्च करण्याची तयारीही मी दर्शवली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नजीक उलवे नोड हा भाग सिडको विकसित करत आहे. अटल सेतूमुळे मुंबईच्या अगदी नजीक आली आहे. या भागात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य दिव्य स्मारक उभारण्याची संकल्पना गव्हाण आणि उलवे विभागातील नागरिकांनी मांडली आहे. या स्मारकासाठी सिडकोकडे जमीन मागितली होती. ती जमीन सिडको देण्यास तयार झाली आहे. अश्वारूढ पुतळ्यासाठी साधारण एक एकर जमीन सिडकोने राखीव ठेवली आहे तर मैदानासाठी पाच एकरचा भूखंड राखीव ठेवण्यात आला आहे. शेतकऱ्यांकडून १५ हजार रुपये एकरी या भावाने सिडकोने त्यावेळी जमीन खरेदी केली आहे, मात्र आता त्याच एकरसाठी जवळपास पाच कोटींच्यावर रक्कम भरण्यास सिडकोकडून सांगण्यात येत आहे.सामाजिक कार्यासाठी संस्था संघटनांना नाममात्र शुल्कात भूखंड सिडकोकडून दिले जाते. त्याच धर्तीवर ही जमीन सामाजिक कार्यासाठी नाममात्र दरात मिळावी. खरेतर प्रकल्पग्रस्त उभारत असलेल्या प्रकल्पाला सिडकोने जमीन मोफत द्यायला हवी. या बाबतीत आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत. भूमिपुत्रांकडून उभारण्यात येणाऱ्या या शिवसृष्टीला ते सहकार्य करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त करत या ठिकाणी शिवाजी पार्क प्रमाणे आणि महाराष्ट्राला अभिमान वाटेल असा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि त्या अनुषंगाने शिवसृष्टी तसेच मुलांना खेळण्यासाठी प्ले गार्डन, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरुंगुळा केंद्र, संमेलने, क्रीडा स्पर्धा, राजकीय सभा, सांस्कृतिक महोत्सव व अन्य कार्यक्रमांसाठी उभारण्यात येणारे हे भव्य मैदान नागरिकांना खूप फायदेशीर ठरणार आहे. यासाठी मी खर्च करणार असलो तरी यावर सर्वांचा हक्क राहील आणि या सर्व वास्तूंचा ताबा अधिकार गव्हाण ग्रामपंचायतीकडे राहील, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी अधोरेखित केले.

***विजेत्या खेळाडूंना भरघोस रक्कमेची बक्षिसे***

*या क्रीडा महोत्सवात राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा, खो-खो, कबड्डी तसेच धावणे, भाला फेक, थाळी फेक, गोळा फेक, कीड व्हेलीन थ्रो, हातोडा फेक या अॅथलेटीक्स स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेत सात हजारपेक्षा जास्त खेळाडूंचा सहभाग नोंदीत झाला आहे. राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेतील एकूण विजेत्यांना सात लाख ५६ हजार रुपये, खो-खो मधील एकूण विजेत्यांना एक लाख ४३२०० रुपये, कबड्डी स्पर्धेतील मधील एकूण विजेत्यांना एक लाख ८१ हजार रुपये तर अॅथलेटीक्स स्पर्धेतील एकूण विजेत्यांना चार लाख ११ हजार रुपये अशी एकूण तब्बल १४ लाख ९१ हजार २०० रुपयांची रक्कम आणि चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. विजेत्या खेळाडूंना भरघोस रक्कमेची बक्षिसे आणि विनामूल्य प्रवेश या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.*

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतली पनवेलमधील १० क्षयरुग्णांची जबाबदारी

महापालिकेचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी म्हणाले, प्रधानमंत्रीनरेंद्र मोदी यांनी २०२५पर्यंत भारत देश क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय ठरविले आहे. या उद्देशाने ७ डिसेंबर ते २४ मार्च २०२५ अशी १०० दिवसांची क्षयरोग मोहिम हाती घेण्यात आली आहे. या रोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आपण सर्वांनी हातात हात घेऊन काम करायचे आहे.

या वेळी दीपक फर्टिलायझर व ईशान्य फाऊंडेशन यांच्यावतीने क्षयरूग्णांना फूड पॅकेटचे वाटप करण्यात आले. तसेच क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्याविषयीची प्रतिज्ञा उपस्थितांनी घेतली. या वेळी चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड यांनी केले.

## ‘ग्रिस्टॅक’बाबत मार्गदर्शन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तहसीलदार कार्यालयात सोमवार (दि.२०) ग्रिस्टॅक योजनेविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागातर्फे राज्यात ही योजना राबविण्यात येणार आहे.

या योजनमुळे राज्यातील शेतकऱ्यांचा कल्याणासाठी केंद्र, राज्य शासनाद्वारे राबविण्यांत येणाऱ्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना सुलभ, पारदर्शक पध्दतीने वेळेवर उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, उच्च-गुणवत्तेची कृषनिविष्ठा, विपणन, स्थानिक आणि विशिष्ट तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

## विविध रिक्त पदांसाठी भरती

**रायगड :** माजी सैनिक/विधवा/युद्ध विधवा यांच्याकरिता कर्मचारी वर्ग-मेस्को पर्यवेक्षक, वाहन चालक, लिपिक, शिक्षण आणी शारीरीक प्रशिक्षण प्रशिक्षक, स्टोअर किपर सह कँटीन आणी वसतिगृह पर्यवेक्षक, कार्यालयीन परीचर, अधिकारी वर्ग-प्रकल्प व्यवस्थापक, क्षेत्रिय व्यवस्थापक, व्यवस्थापक, व्यवस्थापक लेखमाजी अशा एकूण-२७ रिक्त पदांसाठी वर्गवारी नुसार भरती करावयाची असून जिल्ह्यातील इच्छुक माजी सैनिकांनी रिक्त पदांकरीता अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत) यांनी केले आहे.

उमेदवारांनी अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख २७ जानेवारी २०२५ अशी आहे.

## कायदा व सुव्यवस्थेसाठी माणगावमध्ये रूट आणि फ्लॅग मार्च

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

कायदा व सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी (दि.२३) रोजी सायंकाळी माणगाव पोलीस ठाणे कचेरी रोड, मोरबा नाका, बाजारपेठ, निजामपूर नाका, निजामपूर रोड, कालवा रोड तहसील कार्यालय असा रूट मार्च व फ्लॅग मार्च आयोजित करण्यात आला होता.



द्रुत कार्य बलचे सहायक कमांडंट अजीत कुमार अण्णा क्षीरसागर यांनी केले. त्यांच्यासोबत निरीक्षक दत्तात्रय मोहिते, जनसंपर्क अधिकारी धनंजय गुजर आणि ३३ कर्मचारी तसेच माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी व माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे, एपीआय भोसले, एपीआय बेलदार, पीएसआय काळे व २१ अंमलदार सहभागी झाले होते.

फ्लॅग मार्चचा मुख्य उद्देश कायदा व सुव्यवस्था कायम ठेवणे आणि नागरिकांना पोलीस प्रशासन व द्रुत कार्य बल तत्परतेचा संदेश देणे हा होता.

## माझी वसुंधरा ५.० साठी ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द तत्पर

**चौक,: प्रतिनिधी**

माझी वसुंधरा ५.० अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द यांनी विविध पर्यावरण पूरक आणि सामाजिक उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आदिवासी दुर्गम भागातील आदिवासी भागात विकास उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली आहे.

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द ही अनेक वाड्या वस्त्या डोंगर भागात विखुरली आहे.डोंगर आणि दुर्गम भागातील आदिवासी जनतेसाठी काम करण्यास वेगळी ऊर्जा मिळते, असे ग्रामपंचायत अधिकारी महेश म्हसे यांनी सांगून माझी वसुंधरा ५.० अंतर्गत राबवित असलेल्या उपक्रमाची माहिती दिली.

दळण वळण साधने गरजेचे आहे.अनेक माझी वसुंधरा कार्यक्रमांअंतर्गत ग्राम पंचायत बीडखुर्द यांनी माझी वसुंधरा ५.० अंतर्गत ग्राम पंचायत हद्दीतील प्राथमिक शाळांमधून वाचन आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली, यावेळी मुलांच्या कौशल्य गुणांची पारख करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. प्लास्टिक पिशव्या बंदी, झाडे लावा, वृक्ष रोपण करून त्याची जोपासना करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प सोडण्यात आला. स्वच्छ्ता अभियान राबविण्यात येत असून सर्व ग्रामस्थांनी माझी वसुंधरा ५.० अभियान यशस्वी करण्यासाठी सामुदायिक शपथ घेतली.

ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द अंतर्गत मार्गदर्शन शिबिर सरपंच भाऊ बाळू पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. रविंद्र घोगरे ग्रामपंचायत समनवयक यांनी भूमी, वायू, जल ,अग्नि , आकाश या तत्त्वांमध्ये करण्याऱ्या कामाची माहिती दिली. उपसरपंच कैलास दिसले, ग्राम पंचायत अधिकारी महेश पुंडलिक म्हसे, ग्रामपंचायत सदस्या,ग्रामपंचायत बीडखुर्द हद्दीतील सर्व शिक्षक, सी.आर.पी. बचत गट अध्यक्ष, अंगणवाडी सेविका व आशा सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

दुखवटा

## हौसाबाई चव्हाण



**मोहोपाडा :** येथील हौसाबाई कृष्णा चव्हाण यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्या १०२ वर्षांच्या होत्या. त्यांच्यावर मोहोपाडा स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्यात मुले, नातवंडे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. हौसाबाई यांचा दशक्रीया विधी २९ जानेवारी रोजी श्री क्षेत्र गुळसुंदे येथे होणार आहे.

## निवडक

### भावाकडून बहिणीवर अत्याचार




**पनवेल :** काकाच्या मुलाने १६ वर्षीय पीडितेवर अत्याचार केला. या प्रकरणी खारघर पोलिसांनी २२ वर्षीय आरोपीला अटक केली आहे. यातील पीडित तरुणी ही सोळा वर्षीय असून आरोपी २२ वर्षीय आहे. आणि ते दोघेही काकांची मुले आहेत. हे मूळचे अहमदनगर येथील असून पाच ते सहा महिन्यांपासून खारघरमध्ये राहतात. १६ जानेवारीला आरोपीने पीडित तरुणीला घरातून घेऊन अहमदनगरला गेला. या वेळी लॉजवर तिच्यावर अत्याचार केला. मुलगी घरात नसल्याने घरातील नातेवाईकांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर १७ जानेवारीला पीडित तरुणी घरी आल्यानंतर तिने सर्व प्रकार घरी सांगितला. त्यानंतर आरोपी विरोधात पोलिसांकडून पोकसो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

### वामनाश्रम स्वामींचा दर्शन सोहळा

**पनवेल :** वैश्य समाज बांधव पनवेल तालुका यांच्या वतीने काशी तथा हळदीपूर मठाधिपती वैश्य गुरु श्री श्री वामनाश्रम महास्वामी यांचे आशीर्वचन आणि दर्शन सोहळा खारघर सेक्टर ३४, क्रिश सलेस्टिया बिल्डिंग येथील योगेश तांबोळी यांच्या निवासस्थानी करण्यात आले आहे. सोमवार २७ जानेवारी रोजी सायंकाळी साडेचार वाजता संत जनाबाई भजन मंडळ नेरे यांचे भजन आणि साडेपाच वाजल्यानंतर स्वामींचे आशीर्वचन आणि दर्शन सोहळा होणार आहे. या वेळी दर्शनाला येणाऱ्या भाविकांनी पुरुष वर्गाने उपकरण घेऊन येणे आणि महिला वर्ग साडी किंवा ड्रेस (ओढणीसह) परिधान करणे. स्वामींचे दर्शन घेण्याचे आवाहन योगेश तांबोळी आणि हर्षला तांबोळी यांनी केले आहे.

# ऑटो रिक्षा, स्कूटी चोरणाऱ्यांना अटक

## २० लाख ४५ हजारांच्या १७ गाड्या हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलसह खारघर, कळंबोली, सीबीडी, उलवा, वाशी, नेहरूनगर, बांद्रा, पंत नगर, खार आदी ठिकाणावरून १७ ऑटो रिक्षा व स्कूटी चोरी करणाऱ्या दोन सराईत आरोपींना सीबीडी पोलीसांनी अटक करून त्यांच्या कडून जवळपास २० लाख ४५ हजार किमतीच्या गाड्या हस्तगत केल्या आहेत.

सीबीडी पोलीस ठाण्यात फिर्यादी यांची ॲक्टीव्हा स्कूटी का एचएच ४३ एई ६३३८ ही आयकर कॉलनी, सेक्टर २१/२२. सीबीडी बेलापूर येथून चोरी झाली होती. तक्रार दाखल होताच पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, उपायुक्त पंकज डहाणे, सहाय्यक आयुक्त मयूर भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदेश रेवले, निरीक्षक अरूण पवार यांचे देखरेखीत सीबीडी पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण कक्षाच्या पथकाने गुन्हयातील चोरी झालेल्या वाहनाचा व अज्ञात आरोपीचा शोध घेतला.

सुमारे ५० ते ५५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी करत अशरफ आलम शेख (वय २१ वर्षे, रा. टाटानगर झोपडपट्टी, सेक्टर १०) व त्याचा सहकारी रमजान अब्दुलमतीन शेख उर्फ पापा (वय २२ वर्षे टाटानगर, सेक्टर १०) या दोन संशयित आरोपी निष्पन्न केले. या संशयितांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करून त्यांच्याकडून फिर्यादी यांची ॲक्टीव्हा स्कूटी हस्तगत करण्यात आली. तपासामध्ये त्यांच्या कडून चोरीच्या १७ गाड्या ज्याची किंमत २० लाख ४५ हजार इतकी आहे त्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

## विचुंबे येथे गुटख्याचा साठा जप्त

### पोलीस व अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील विचुंबे येथे गुटख्याचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. गुरुवारी (दि.२३) सकाळी जवळपास साडे सातच्या सुमारास विचूंबे परिसरात काही अवैध गोष्टी घडत असल्याची माहिती गुप्त बातमीदारांच्या माध्यमातून मिळाली.

या अनुषंगाने पोलीस प्रशासन व अन्न नागरिक औषध प्रशासन यांच्या माध्यमातून या ठिकाणी धाड टाकण्यात आली त्या ठिकाणी तपास केला असता मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा आढळून आला. त्याची किंमत जवळपास २० लाख असून याबरोबर एक दुचाकीसुद्धा हस्तगत करण्यात आली आहे.

सध्या महाराष्ट्रात गुटखा बंदी असल्याने असा साठा ठेवण्यास कायद्याच्या दृष्टीने मज्जाव आहे. ही कारवाई अन्न व औषध प्रशासन व खांदेश्वर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी, गुप्त वार्ता कोकण विभाग उत्तरेश्वर बडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पनवेलमधील विचुंबे गावात एका चाळीतल्या खोलीमध्ये आढळून आलेला २० लाख ६ हजार किंमतीला गुटखा जप्त करण्यात आला आहे.

यामध्ये एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुटखा पान मसाला अशा तंबाखू युक्त पदार्थ मिळून आतापर्यंत जवळपास २८ लाखांचा मुद्देमाल व माल पोचवण्यासाठी वापरण्यात आलेल्या दुचाकीदेखील जप्त करण्यात आली आहे.

## फडके नाट्यगृहामध्ये पनवेल पंचायत समितीची आमसभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीची आमसभा ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आली आहे.

सन २०२४-२०२५ची आमसभा आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सहअध्यक्षतेखाली विषयपत्रिकेनुसार कामकाज चालविण्यासाठी भरविण्यात येणार आहे. याबाबतची माहिती गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनी दिली.



**पनवेल : रेल्वे पोलीस ठाण्यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली महिला पोलीस हवालदार वरेकर, महाले, जाधव, महाले, थोरात, रासकर व पनवेल रेल्वे पोलीस ठाणेतील सर्व महिला पोलीस अंमलदारांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, सरचिटणीस सपना पाटील, सोनम महाडिक, अरुणा पाटील, आशा तळोजकर, शैला आंबेकर आदी उपस्थित होते.**

## पनवेलमध्ये महाआरती आणि हळदीकुंकू

**पनवेल : वार्ताहर**

हिंदवी सेनेच्यावतीने महाआरती आणि हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन विरुपाक्ष मंदिरामध्ये केले होते. या कार्यकमाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या तसेच आरती करून दर्शन घेतले.

अयोध्या येथील प्रभू राम मूर्ती प्रतिष्ठापना दिवस तसेच पनवेल हिंदवी सेने संघटनेचा प्रथम वर्धापन दिन साजरा झाला. या दिनाचे औचित्य सोडून हिंदवी सेनेचे निलेश पाटील आणि परेश मुरबाडकर यांच्या वतीने पनवेल शहरातील वीरुपाक्ष मंदिरामध्ये महाआरती आणि हळदी कुंकू समारंभाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, मित्तल पाटील, प्रीतम म्हात्रे, केदार भगत, रुपेश नागवेकर, पत्रकार संजय कदम, विशाल सावंत, प्रकाश वाघे, दिनेश गिल्डा, राकेश ठाकरे, संजय मुरकुटे, ॲड. रुपाली चव्हाण, माधुरी गोसावी, शिल्पा पवार, सुजाता नलावडे, अश्विनी मुरबाडकर, सविता मिश्रा, वैभव आंग्रे, कुणाल जैतपाल, हेमंत अधिकारी, भूषण पोवळे, गिरीश चव्हाण, आकाश भाटी यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## अक्षीकर विद्यासंकुलाचा वार्षिक समारंभ

**उरण : वार्ताहर**

कै.गो.ना.अक्षीकर विद्या संकुलातील जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट इंग्लिश मीडियम स्कूल उरण प्री प्रायमरी आणि प्रायमरी यांच्यातर्फे शाळेमध्ये वार्षिक समारंभ दिवस साजरा करण्यात आला.



या वेळी प्रमुख अतिथी जितेंद्र मिसाळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरण, राखी धिंग्रा मॅडम फाउंडर अँड चेअरमन पीस अँड एज्युकेशन ट्रस्ट हे मान्यवर उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महेश म्हात्रे बोर्ड ऑफ डायरेक्टर जी. ई. आय. दादर यांनी भूषविले.

माजी शालेय समिती अध्यक्ष सदानंद गायकवाड, शालेय समिती सदस्य, संकुलातील मुख्याध्यापक, माजी सदस्य, मुख्याध्यापक-शिक्षक आदी या वेळी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

## दहावीच्या विद्यार्थ्यांचे २८ वर्षानंतर गेट टुगेदर

**उरण : वार्ताहर**

दहावीच्या १९९६च्या बॅचचा २८ वर्षानंतर गेट टुगेदरचा कार्यक्रम पनवेल येथील कृष्णाई फार्म हाऊसजवळ नुकताच झाला अमिता, भारती ठाकूर अस्मिता, पद्मावती,सुवर्णा, क्रांती, उत्क्रांती, गीता चिमणे या महिला भगिनींनी हा कार्यक्रम आयोजित केला.

सारडे गावातील दिपक पाटील, वशेनी गावातील महेश, नरेंद्र, विद्या पाटील यांनी आपापले कलागुण सादर केूले. अमित पाटील, रवींद्र, प्रशांत, सुधा, निलेश, अजित जोशी, उल्हास, शेखर, प्रदीप पाटील, सुरेश म्हात्रे, विष्णु म्हात्रे, संजय पाटील, संतोष म्हात्रे, दिपक गावंड, विष्णु म्हात्रे, किशोर ए आणि किशोर बी यांनी मैफिलमध्ये चार चांद लावले.



जेवणाची उत्तम व्यवस्था विष्णु पाटील, सचिन गावंड आणि एमडीएसचे मालक अतिश म्हात्रे यांनी केली. सर्वांनी नृत्य, गाणी, जोक्स, दहावीत १९९६जे वर्गात घडले त्याची आठवण आवर्जून करून दिली.



**पनवेल : महापालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त कैलास गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, उप अभियंता विलास चव्हाण, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, माजी नगरसेवक नितीन पाटील, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी आदी उपस्थित होते.**

## लायन्स सरगमतर्फे आदिवासीवाडीमध्ये हळदीकुंकू

**पनवेल : वार्ताहर**

मकर संक्रांतीनिमित्त लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे वाघाची वाडी जवळील छोटी धामणी येथील आदिवासी महिलांसाठी हळदीकुंकू तसेच काही मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

या उपक्रमासाठी समन्वयाचे काम सत्कर्मश्रद्धाश्रम येथील कार्यकर्त्यांनी उत्तमरीत्या साधले. या प्रसंगी बोलताना अध्यक्ष मानदा पंडित यांनी सांगितले की सत्कर्म श्रद्धालयाचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतल्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकला. या वेळी उपस्थित महिलांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून अतिशय समाधान वाटत आहे आणि भविष्यात सुद्धा आम्ही असेच कार्यक्रम करत राहू. या वेळी लहान मुले आणि महिलांसाठी विविध मनोरंजक खेळ आयोजित केले होते त्याचा आनंद सर्व सहभागी महिला आणि मुलांनी घेतला.

सर्व महिलांना संक्रांतीचे वाण देण्यात आले तसेच सर्व उपस्थितांना तिळगुळ आणि खाऊ देण्यात आला. क्लबच्या अध्यक्षा डॉ. मानदा श्री पंडित, सुषमा पन्हाळे, संध्या महानुभाव, स्वस्तिश्री पंडित, दुहिता पंडित, आदित्य दोशी तसेच सत्कर्म श्रद्धालयाचे विवेक देवगावकर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## चाऱ्याच्या शोधात मेंढपाळांची भटकंती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात तालुक्याच्या ठिकाणी मेंढपाळांचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात आगमन जरी होत असले तरीसुद्धा चाऱ्याच्या आभावाने मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत आहे. हि वस्तूस्थिती सध्या तालुक्याच्या ठिकाणी निर्माण झाली आहे.

पूर्वी कोकणात मोठ्या प्रमाणात चारा असायचे, मात्र गेल्या काही वर्षात औद्योगिकरणांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरल्याने, शिवाय जंगले नामशेष होत असल्यामुळे, त्याचबरोबर पावसाला संपताच वणवे मोठ्या प्रमाणात लागले जात असल्यामुळे, या सर्व कारणावरुन मेंढ्यावर उपासमारीचे संकट निर्माण झाले आहे. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याच्या



समस्या मोठ्या तिव्रतेने जाणवत आहे. पूर्वी माळरान आणी डोंगराच्या परिसरात काटेरी वनस्पती मोठ्या प्रमाणात असायचे, हेच अन्न म्हणून शेळ्या, मेंढ्या भक्षण करीत असे, यामुळे दुध उत्पादन वाढ होत होती, मात्र चाऱ्याच्या अभावाने आम्ही आर्थिक संकटात सापडत आहोत.

पावसाळा संपताच घाटमाथ्या वरील असलेले मेंढपाळ आपल्या जवळ असलेला लावाजावा घेवून कोकणात येत असतात आणि पशुधन जगविण्यासाठी आम्ही कोकणाच्या परिसरात भटकंती करीत असतो. याच बरोबर आमचे जितराबाचे लोंढेच्या लोंढे आमच्या बरोबर असून, शेळ्या मेंढ्यांच्या घोळक्यात घोडे, कुत्रे, कोंबड्या असा लवाजमा त्यांच्याजवळ असतो. जागा मिळेल तिथे मुक्काम आणी सकाळी पुढे प्रवासाला जाणे, असा नित्यक्रम मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत चालत असतो, पावसाळा सुरू होताच आम्ही मंडळी गावी पोचतात. असे मत घाटमाथ्यावरून आलेल्या मेंढपाळांनी बोलताना व्यक्त केले.

## सांस्कृतिक महोत्सवाचा सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स पनवेल मध्ये १८ जानेवारी ते २२ जानेवारी २०२५ या कालावधीत सांस्कृतिक महोत्सवाचा भव्य सोहळा संपन्न झाला.

स्टुडन्ट कॉन्सिल विभागाच्या वतीने आयोजित या महोत्सवात बॉलीवूड डे, मिस्टर आणि मिस बार्न्स स्पर्धा, ट्रॅडिशनल डे, नो बॅग डे, गँग डे, खाऊ गल्ली यांसारख्या विविध उपक्रमांनी महाविद्यालयाचा उत्साह द्विगुणित केला.

या महोत्सवाचे उद्घाटन डॉ. शिवदास कांबळे यांच्या



हस्ते करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य कल्पेश भोईर, उपप्राचार्या के.डी. शारा, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख प्रा. अंजु सोंखला व सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महोत्सवातील मिस्टर बार्न्स आणि मिस बार्न्स स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचा मुख्य केंद्रबिंदू ठरली. या स्पर्धेसाठी प्रा. प्रशांत पाटील, प्रा. मयुरी वडके, आणि प्रा. हर्षदा लोखंडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांच्या न्याय व अभ्यासपूर्ण निर्णयांमुळे या स्पर्धेला विशेष प्रतिष्ठा मिळाली. या महोत्सवाने विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना वाव मिळवून दिला आणि महाविद्यालयाच्या वातावरणाला नवीन रंग भरले. हा सांस्कृतिक महोत्सव विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि आनंददायी ठरला. बार्न्स कॉलेजने यशस्वीरीत्या सादर केलेल्या या कार्यक्रमाची सर्वत्र प्रशंसा होत असून, विद्यार्थ्यांसाठी हा एक अविस्मरणीय अनुभव ठरला आहे.

## संपादकीय

# घबराटीचे बळी

भुसावळजवळ बुधवारी झालेल्या दुर्दैवी रेल्वे दुर्घटनेबद्दल जबाबदार तरी धरायचे कुणाला? यंत्रणेत कुठलाही दोष नसताना ही दुर्घटना घडली आहे असे प्राथमिक तपासात दिसते. रेल्वेगाड्यांतील गर्दीतून प्रवास करणाऱ्या गोरगरीब, अशिक्षित प्रवाशांना आपत्कालीन परिस्थितीत वर्तन कसे असावे याविषयी जागरूक करण्यासाठी प्रभावी मोहीम राबवली तरच अशा दुर्दैवी घटना टाळता येऊ शकतील.

**भुसावळजवळ बुधवारी सायंकाळी झालेल्या भीषण रेल्वे दुर्घटनेत १२ जणांचा मृत्यू झाला असून ११ जण जखमी झाले आहेत. काही प्रवासी गंभीर जखमी असल्यामुळे मृतांची संख्या वाढण्याचीही शक्यता आहे. डब्याखाली आग लागल्याची अफवा पसरल्याने लखनऊ-मुंबई पुष्पक एक्सप्रेसमधील प्रवाशांनी घाबरून रूळावर उड्या मारल्या. त्याचवेळी विरुद्ध बाजूने येणाऱ्या कर्नाटक एक्सप्रेसने अनेक प्रवाशांना धडक दिल्याने ही दुर्दैवी घटना घडली. अशा दुर्दैवी अपघातात काही निरपराध नागरिकांचे हकनाक बळी गेल्यानंतर हळहळण्यापलीकडे काय प्रतिक्रिया उमटणार? घबराटीमुळे स्वत:हून चालत्या गाडीतून उड्या मारून दुसऱ्या गाडीखाली येऊन प्रवासी मृत्यूमुखी पडल्यानंतर ठपका तरी कुणावर ठेवायचा? उपजीविकेच्या शोधात मेंढरांसारखा प्रवास करत निघालेल्या गोरगरीब, अशिक्षित जनतेला आपत्कालीन परिस्थितीत तारतम्य बाळगून वागणे शिकवणे सोपे नाही. एखाद्या अफवेमुळे, कोलाहलामुळे घबराट उडून गर्दीची पळापळ होणे हे आपल्याकडे अनेकदा घडते. चेंगराचेंगरीच्या घटना त्यातूनच घडतात. बरेचदा गर्दीतली ही माणसे गर्दी लोटेल तेथे लोटली जातात. अशावेळी प्रसंगावधान राखून वागण्याचा पर्याय कुणाच्या हाती असतो? प्राथमिक माहितीत, यंत्रणेत कुठलाही दोष नसताना, निव्वळ घबराटीतून प्रवाशांकडून हे वर्तन घडले असे दिसते. बहुतांश मृत तसेच जखमी प्रवासी उत्तर प्रदेश आणि बिहारमधील असून तीन जण नेपाळचे आहेत. कुणीतरी साखळी खेचल्याने चालकाने गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी चाकांचे घर्षण होऊन ठिणग्या उडाल्या. रुळांवरील कापडाने पेट घेतल्याने धूर निघाला व बोगीतील प्रवाशांनी आग लागल्याची बोंब ठोकली. गाडी पुरती थांबलेलीही नसताना दोन्ही बाजूंनी प्रवाशांनी बाहेर रूळांवर उड्या मारल्या. एका बाजूच्या प्रवाशांना काही झाले नाही, परंतु दुसऱ्या बाजूला त्याचवेळी विरुद्ध दिशेने कर्नाटक एक्सप्रेस भरधाव जात होती. उड्या मारलेले काही प्रवासी या गाडीखाली सापडताच अन्य प्रवाशांनी पुन्हा पुष्पक एक्सप्रेसच्या दारातून आत शिरण्यासाठी गर्दी केली. त्यामुळे आणखी प्रवासी गाडीखाली आले असे सांगितले जाते. घटना घडली त्याठिकाणी अरुंद वळण असल्याने विरुद्ध दिशेने येणारी गाडी उड्या मारणाऱ्या प्रवाशांना आधी दिसली नाही. पुष्पक एक्सप्रेसच्या लोकोपायलटने नियमानुसार रेल्वेगाडीचा फ्लॅशर लाइटही चालू केला. त्यामुळे विरुद्ध बाजूने येणाऱ्या कर्नाटक एक्सप्रेसच्या लोकोपायलटने आपत्कालीन ब्रेक कार्यान्वित केले व हॉर्नही वाजवला असे सांगितले जाते. परंतु योग्य वेळी गाडी थांबू शकली नाही. काही प्रवाशांना धडक दिल्यानंतरच ती थांबली. नेहमीप्रमाणे याही अपघाताच्या कारणांची चौकशी होईल. चौकशीत आणखी तपशील समोर येतीलही. पण अशा घटना टाळणे सोपे आहे का? अशाप्रकारचे अपघात पुन्हा होणार नाहीत याची काळजी घेण्यासाठी रेल्वे प्रशासनाला प्रभावी लोकजागृती मोहीम राबवावी लागेल. खबरदारीचे उपाय म्हणून काही आधुनिक यंत्रणांचाही वापर करावा लागेल. जेणेकरून नेमके काय घडते आहे याची माहिती वेळीच प्रवाशांना मिळून घबराट टाळता येऊ शकेल. आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांचे वर्तन कसे असावे याविषयी सूचना करत राहणे एवढेच तूर्तास शक्य दिसते.**

# अजूनही रायगडात सुरू आहे बालविवाहाची परंपरा



## खबरबात
प्रकाश सोनवडेकर

रायगड जिल्हा हा झापट्याने विकसीत होत असलेला जिल्हा आहे. औद्योगिक जिल्हा आहे. जिल्ह्यात शहरीकरण वेगात होत आहे. सामजिक परिवर्तनात आघाडीवर असलेला हा जिल्हा आहे. तरीदेखील आजही या जिल्ह्यात बालविवाहाची परंपरा सुरू आहे. ही खेदाची गोष्ट आहे. रायगड जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात बालविवाहप्रकरणी बारा गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यातही रायगड जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अंतर्गत बारा गुन्ह्यांची नोंद झाली आहे. अल्पवयीन मुलीना गर्भधारणा झाल्याने रुग्णालयात दाखल करण्याचे प्रमाणही लक्षणीय असल्याचे समोर आले आहे. अल्पवयीन मुलामुलींची लग्न रोखण्यासाठी देशात बालविवाह प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला असला तरी बालविवाहाचे प्रमाण काही कमी झालेले नाही. कायदा करून हे बालविवाह रोखता येणार नाहीत. याबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे. शासनपतळीवर असे प्रयत्न होत आहेत. ते अपुरे पडत आहेत. सामाजिक संस्थांनी यासाठी पुढाकर घ्याला हवा.

ज्या ठिकाणी आदिवासी समाजाचे वास्तव्य आहे. त्या ठिकाणी बालविवाहाची प्रथा अजूनही सुरू आहे. सन २०२३ मध्ये रायगड पोलीस दलाच्या हद्दीत बालविवाह केल्या प्रकरणी सात गुन्ह्यांची नोंद झाली. पेण, महाड, नागोठणे, रेवदंडा, रोहा, पोलादपूर आणि कर्जत मधील गुन्ह्यांचा समावेश आहे. तर २०२४ मध्ये पाच गुन्ह्यांची नोंद झाली. तळा, महाड, म्हसळा, पेण, पोयनाड मधील गुन्ह्यांचा समावेश आहे. जिल्ह्यात बालविवाहाची प्रथा सुरू आहे हे पोलिसांच्या आकडेवारीवरून सिध्द होते.

रायगड जिल्ह्यात प्रामुख्याने आदिवासी आणि कातकरी समाजात अल्पवयीन मुलांची लग्न लावण्याचे प्रमाण अधिक आहे. आदिवासी समाजात निरक्षरता, गरीबी आणि स्थलांतरण ही बालविवाहाचे प्रमाण जास्त असण्यामागचे मुळ कारण आहे. रायगड जिल्ह्यातून आदिवासी समाज विट भट्टी, कोळसा खाणी आणि ऊस तोडणीसाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत होत असतो. त्यामुळे बरेचदा लहान मुलांची अबाळ होते. त्यामुळे लहान वयातच मुलामुलींची लग्न लाऊन देण्याकडे कल असतो. रोजगारासाठी होणारे स्थलांतर हेदेखील बालविवाहाचे एक कारण आहे. रोजगारासाठी आदिवासी कुटूंब स्थालांतर करतात. स्थालांतरामुळे मुलांच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे लहानवयातच मुलींचा विवाह केला जातो.

लहान वयात लग्न केल्यास त्याचे शाररीक, मानसिक दुष्परिणाम होत असतात. याची झळ प्रामुख्याने अल्पवयीन मुलींना सहन करावी लागते. माता व बालमृत्यू कुपोषण यासारख्या समस्या निर्माण होतात. रायगड जिल्ह्यात गेल्या वर्षभरात महिला व बाल विकास विभागाने केलेल्या सर्वे क्षणात तीव्र कुपोषित श्रेणीतील ८८ बालके, सौम्य कुपोषित श्रेणीतील ४४९ बालके आढळून आली. कर्जत, रोहा, माणगाव, पोलादपूर, श्रीवर्धन, महाड या तालुक्यात कुपोषित बालकांचे प्रमाण अधिक होते. तर वर्षभरात ५७ बालमृत्यूची नोंद झाली असून, यातील ४० बालके ही शुन्य ते एक वयोगटातील आहेत.

बाल विवाहामुळे दोन पिढ्या कुपोषित होता. मातामृत्येचे प्रमाण वाढते. सामाजिक मागासलेपण तर येतेच, पण समाजाच्या प्रगतीतही अडथळा निर्माण होतो. हे या सामाजाला समजावून सांगण्याची गरज आहे. बालविवाह रोखण्यासाठी देशात बालविवाह प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला असला तरी बालविवाहाचे प्रमाण काही कमी झालेले नाही. शिक्षणाच्या अभावामुळे असेल किंवा सामाजिक परंपारा असेल म्हणून बालविवाह होत असतील तर चुकीचे आहे.

बालविवाहासारख्या प्रथा रोखण्यासाठी शासन दोन पातळ्यांवर काम करत आहे. एकीकडे बालविवाह करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई केली जात आहे. तर दुसरीकडे बालविवाह रोखण्यासाठी आदिवासी आणि कातकरी समाजाचे प्रबोधनाही करीत आहोत. शासन आपले काम करते, परंतु त्याला जनेतकडूनदेखील साथ मिळाली पाहिजे. बालविवाह रोखण्यसाठी आदिवासी सामजात जनजागृती होणे आवश्यक आहे. कायद्याचा धाक दाखवून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी सामाजिक पातळीवर जाऊन लोकांचे प्रबोधन करावे लागेल. आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढवावे लागेल आणि स्थलांतरण कमी करण्यावर भर द्यावा लागेल.आदिवासी सामाजात समाज पंचायती असतात. या पंचायती केवळ सामाजिक निवाडे करतात, परंतु सामाजिक सुधारणांकडे दुर्लक्ष करतात.

या समाज पंचायतींच्या पंचांनी बालविवाह रोखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच सामाजिक संस्थांनीदेखील याबाबत जनजागृती केली पाहिजे. आदिवासी सामाजला भेडसावणाऱ्या समस्यांबात सामाजिक संस्था काम करत असतात. अनेकदा आदिवासींचे मोर्चेकाढून आवाज उठवतात, परंतु सामाजिक प्रश्नावंर मा. गप्प बसतात. बालविवाह रोखण्यसाठी जनरागृती होणे आवश्यक आहे. ही जनजागृती करण्यासाठी शसान प्रयत्न करत असते त्याला सामाजिक संस्थांनी साथ द्यायला हवी.

# डॉ. होमी जहांगीर भाभा



होमी जहांगीर भाभा हे केवळ भारतामधलं नव्हे तर अणू आणि अवकाश संशोधनाच्या क्षेत्रामधलं आंतरराष्ट्रीय कीर्तीचं नाव आहे. ३० ऑक्टोबर १९०९ रोजी या महान वैज्ञानिकाचा जन्म झाला. मुळात पदार्थविज्ञान हा डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्या अभ्यासाचा विषय होता. या शास्त्रज्ञ वैज्ञानिकाचं वर्णन, 'देशाच्या अणुसंशोधन तसंच अवकाश संशोधनाच्या क्षेत्रामधला एक प्रमुख शिल्पकार' असं केलं. जाते. अणुसंशोधनाचा तसंच अंतरिक्ष संशोधनाचा वापर शांततामय विकास कार्यासाठी होऊ शकतो यावर ज्या वैज्ञानिकांची ठाम आणि अढळ श्रद्धा होती त्यापैकी होमी जहांगीर भाभा हे एक होते.

पंतप्रधान पंडित नेहरू यांचा देशाच्या विकास कार्यासाठी ज्या मोजक्या वैज्ञानिक तंत्रज्ञांवर दृढ विश्वास होता त्यांच्यापैकी एक म्हणून डॉ. होमी जहांगीर भाभा या शास्त्रज्ञाचं नाव घेतलं जायचं. होमी जहांगीर भाभा यांचा जन्म मुंबईतील एका सर्वसामान्य व सदन पारशी कुटुंबामध्ये झाला.

१९४८ मध्ये भारत सरकारनं अणुऊर्जा आयोग स्थापन केला आणि त्याचे पहिले अध्यक्ष म्हणून होमी जहांगीर भाभा या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या वैज्ञानिकाची नेमणूक करण्यात आली. त्यानंतर १९५४ च्या ऑगस्ट महिन्यामध्ये अणुऊर्जा विकासासाठी भारत सरकारनं ज्या वेळी स्वतंत्र खातं निर्माण केलं त्या वेळी त्या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ. भाभा यांचीच नियुक्ती करण्यात आली. या अणुऊर्जा विकास खात्यानं मुंबईत तुर्भे या चेंबूर जवळच्या भागात देशामधलं पहिलं अणु विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ. भाभा यांच्याच नेतृत्वानं उभं केलं. त्यानंतर १९५६ मध्ये याच केंद्रात देशामधलीच नव्हे, तर साऱ्या आशिया खंडामधली, अर्थात रशिया हा देश वगळून, पहिली अणुभट्टी सुरू करण्यात आली. अणुविषयक तसंच अंतरिक्षविषयक अशा दोन्हीही क्षेत्रात संशोधनाचा महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ. होमी जहांगीर भाभा याच आणि याच वैज्ञानिकाला द्यावं लागेल. स्वातंत्र्य देऊन काम करण्याची २४ जानेवारी १९६६ रोजी मॉन्ट ब्लँकजवळ एअर इंडियाचे फ्लाइट १०१ क्रॅश झाले तेव्हा भाभा यांचा मृत्यू झाला.

**(साभार : इंटरनेट)**




# सिम कार्डसाठी फॉर्मसह 'ही' गोष्ट करणे ठरणार बंधनकारक




तुम्ही तुमच्या आयुष्यातला सगळ्यात पहिला मोबाइल घेतल्यानंतर सगळ्यात पहिले घेतले असेल ते म्हणजे नवीन सिमकार्ड. सिमकार्ड घेऊन मग ते ॲक्टिव्ह करून मग फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामसारखे ॲप तुम्ही अगदी सहज वापरू शकता. हे सिमकार्ड घेण्यासाठी तुम्हाला कॉल सेंटरमध्ये जाऊन फॉर्म भरावा लागत होता. पण, आता आणखीन एक नवीन नियम जोडला जाणार आहे.

आतापासून भारतात नवीन सिमकार्ड मिळवण्यासाठी फक्त फॉर्म नाही तर आधार कार्डद्वारे बायोमेट्रिक पडताळणी करणेसुद्धा बंधनकारक असणार आहे. म्हणजेच आता सिमकार्ड मिळवण्यासाठी लोकांना आपले आधार कार्ड दाखवावे लागणार असून बायोमेट्रिक पद्धतीने त्यांची ओळख पडताळली जाणार आहे. मोबाइल कनेक्शनचा गैरवापर होत असल्याची वाढती चिंता दूर करण्यासाठी पंतप्रधान कार्यालयाने दूरसंचार विभागाला सर्व नवीन सिमकार्डसाठी आधार पडताळणी बंधनकारक करण्याचे निर्देश दिले आहेत.

बनावट सिम कार्डांवर कारवाईहे निर्देश दूरसंचार क्षेत्राच्या पुनरावलोकनाचे अनुसरण करतात, ज्याने सायबर गुन्ह्यांमध्ये, विशेषतः आर्थिक घोटाळ्यांमध्ये बनावट सिमकार्डची महत्त्वपूर्ण भूमिका उघड केली आहे. तपासात असे दिसून आले आहे की, गुन्हेगार अनेकदा एकाच डिव्हाईजशी जोडलेले अनेक बनावट सिमकार्ड वापरतात. म्हणून नवीन सिमकार्ड जारी करण्यापूर्वी कठोर नियम लागू करून अशा गैरवापराला आळा घालण्याचे उद्दिष्ट आहे.

विक्रेतेसुद्धा बनावट कागदपत्रांसह सिमकार्ड वितरित करताना आढळल्यास त्यांना कायदेशीर कारवाईसह गंभीर परिणामांना सामोरे जावे लागते. सरकारने, दूरसंचार ऑपरेटरना कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सींना सहकार्य करावे आणि फसवणूक करणाऱ्यांना ओळखण्यासाठी आणि त्यांना पकडण्यासाठी एआय-ड्रिव्हन साधने लागू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. हे प्रयत्न सायबर गुन्ह्यांचे धोके कमी करण्याच्या व्यापक सरकारी उपक्रमाचा भाग आहेत.

# शास्त्रीय गायक पं. भीमसेन जोशी



## निमित्त

संगीत ही मानवाला मिळालेली महत्वपूर्ण देणगी आहे. त्यातून माणसाच्या भावभावना , इच्छा , जीवनात आलेले नैराश्य या सर्व गोष्टीवर मात करता येऊ शकते. भारतीय संगीत परंपरेत अनेक कलाकारांचा मोठा वाट दिसून येतो. त्या वेळी आणि आजही संगीत हेच आपले जीवन मानणाऱ्या कलाकारांची भारतात कमतरता दिसत नाही. यातील एक असामान्य गायक पंडित भीमसेन जोशी. आज त्यांचा स्मृतिदिन. त्यानिमित्ताने घेतलेला आढावा.

भीमसेन जोशी यांचा जन्म ४ फेब्रुवारी १९२२ कर्नाटक येथील गदग याठिकाणी झाला. भीमसेनजींचे वडील पेशाने शिक्षक होते. त्यामुळे भीमसेनजींचा संगीताकडे असणारा कल त्यांना आवडत नसे. त्यामुळे कालांतरानेआपली आवड जोपासण्यासाठी घर सोडावे लागले. त्यांनी पुढे उत्तर भारतात जाऊन उस्ताद अब्दुल करीमखाँ, वझेबुवा, केसरबाई केरकर या सारख्या अन्य उस्तादांकडे त्यांनी गायन-वादन शिकून घेतले. घरी आल्यानंतर त्यांच्या वडीलानी संगीताचा ओढा लक्षात घेऊन कुंदगोळ गावातील रामभाऊ कुंदगोळ यांच्याकडे शिकवणी चालू केली. रामभाऊ सवाई गंधर्व होते. त्यामुळे शास्त्रीय संगीत शिकवण्याकडे अधिक भर होता.पुढे त्यांनी लवकरच पुण्यातील हिराबागेत आपली पहिली संगीत मैफिल भरवली. विमान प्रवासांमुळे, त्यांना पु.ल. देशपांडे यांनी गमतीने 'हवाईगंधर्व' ही पदवी बहाल केली होती. कित्येक वेळा एकाच दिवसात दोन शहरांतील मैफली घेण्यासाठी ते दोनदा विमानप्रवास करीत असत. भीमसेन जोशींना हिंदुस्थानी शास्त्रीय गायन पद्धतीचे ख्याल गायक म्हणत असले तरी त्यांनी १९४०च्या दशकात लखनौ मध्ये एक वर्ष राहून तेथील प्रसिद्ध गायकांकडून ठुमरी शिकून घेतली होती.

आपल्या गुरूच्या स्मरणार्थ त्यांनी १९५२ सालापासून सवाई गंधर्व संगीत महोत्सव सुरु केला होता. भीमसेन जोशींनी सुरवात जरी जाऊन केली होती तरीही त्यांना प्रत्येक गायनाचा प्रकार आवडायचा. त्यामुळे जयपूर येथील गंधर्व महाविद्यालयाने संगीताचार्य हि पदवी बहाल केली भारतात शास्त्रीय गायनाच्या हिंदुस्थानी आणि कर्नाटकी या दोन प्रमुख शाखा मानल्या जातात. भीमसेन जोशींचे वैशिष्ट्य असे की ते दक्षिण भारत प्रचलित असलेल्या कर्नाटकी गायनातल्या चीजा हिंदुस्थानी पद्धतीने गाऊन दाखवीत. त्यामुळे त्यांचे गायन कर्नाटकी संगीताची परंपरा असलेल्या दक्षिणी भारतातही, विशेषतः तरुण पिढीमध्ये लोकप्रिय झाले.

पंडितजीनी आपल्या आयुष्यात सर्वांत जास्त प्रेम केलं असेल तर ते फक्त गायनावर. त्यांनी विविध संगीत मैफिलीतून संगीताला चालना दिली. त्यांनी केलेल्या संगीतसेवेमुळे भारतीय शास्त्रीय संगीतात पंडित भीमसेन जोशींचे स्थान अजरामर झाले आहे. महाराष्ट्र सरकार दरवर्षी भीमसेन जोशी यांच्या नावाचा भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार देते. आतापर्यंत हा पुरस्कार किशोरी आमोणकर, पंडित जसराज यांना मिळाला आहे. या महान गायकाचे २४ जानेवारी २०११ रोजी पुणे येथे वयाच्या ८८व्या वर्षी देहावसान झाले.

**-गोकुळ एकनाथ पवार**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# लघवीमधून फेस येतोय? आजाराचे लक्षण नाही ना?

शरीर विविध आजारांचे संकेत आपल्याला वेगवेगळ्या लक्षणांच्या माध्यमातून देत असते. यातील अनेक लक्षणं आपल्याला लघवीच्या माध्यमातूनही ओळखता येतात. जसे की, कावीळची लक्षणं अनेकदा लघवीच्या रंगावरून ओळखली जातात. अगदी त्याचप्रकारे काही आजारांची लक्षणंदेखील लघवीच्या माध्यमातून दिसून येतात. लघवीतून फेस येणं ही गोष्ट सामान्य असली तरी ती वारंवार होत असल्यास हे गंभीर आजाराचे लक्षण असू शकते.



याच विषयावर फंक्शनल मेडिसिन प्रॅक्टिशनर डॉ. शर्ली कोह म्हणाल्या की, लघवीतून फेस येणं ही सामान्य गोष्ट असली तरी तुम्ही शरीर हायड्रेट ठेवलं पाहिजे. लघवीला झाल्यास ती रोखण्याचा प्रयत्न करू नका, शक्य तितक्या लवकर ती पास करा. यामुळे फेस येण्याचे प्रमाण कमी होऊ शकते, पण इतकी काळजी घेऊनही लघवीतून वारंवार फेस येऊ लागल्यास हे शरीरातील प्रथिनांच्या कमतरतेमुळे होऊ शकते. अशावेळी तुम्ही डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्यावा.

मीरा रोडमधील वोक्हार्ट हॉस्पिटल्समधील कन्सलटंट न्यूरोलॉजिस्ट डॉ. आशुतोष बघेल म्हणाल्या की, लघवीतून कधी ना कधी फेस येणे सामान्य असू शकते, परंतु वारंवार फेस येत असेल तर हे गंभीर आजाराचे लक्षण असू शकते.

सामान्यपणे लघवीच्या जलद प्रवाहामुळेही फेस तयार होतो. तसेच प्रोटीन्युरिया किंवा मूत्रपिंडाच्या समस्या, शरीरातील प्रोटीनची कमतरता, यामुळेही लवघीमध्ये वारंवार फेस येण्याची समस्या जाणवू शकते.

निर्जलीकरणामुळेही खूप गडद रंगाची व फेसयुक्त लघवी होऊ शकते. काही दुर्मीळ प्रकरणांमध्ये, कोलोवेसिकल फिस्टुला किंवा मूत्रमार्गाचा संसर्ग यांसारख्या समस्यांमुळेही असे होऊ शकते. सूज, थकवा किंवा लघवीच्या रंगातील बदल यांसारख्या लक्षणांसह वारंवार फेस येत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेण्यास अजिबात संकोच करू नका.

निरोगी जीवनशैली जगण्याचा प्रयत्न करा. यासाठी पुरेसे पाणी पिऊन हायड्रेट राहा, मिठाचे सेवन कमी करा, निरोगी आहाराचे सेवन करा, कारण या प्रतिबंधात्मक उपायांच्या माध्यमातून तुम्हाला लघवी संबंधित आजारांपासून दूर राहता येऊ शकते, असेही डॉ. बघेल म्हणाले.

*(टीप- वरील बातमी आरोग्यतज्ज्ञांनी माहितीच्या आधारे लिहिली आहे, परंतु कोणतेही उपाय करण्याअगोदर डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्या.)*

# श्रीवर्धन तालुक्यात भव्य मत्सालय व पर्यटक विश्रामगृहाची निर्मिती, पर्यटनाला नवजीवन



**श्रीवर्धन :- भारत चोगले**

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगार आणि हरिहरेश्वर येथील समुद्रकिनारी भव्य मत्सालय (एक्वारियम) आणि पर्यटक विश्रामगृह निर्माण करण्यासाठी आज मंत्रालय दालनात महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत तालुक्यातील पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

पर्यटकांना उत्तम सुविधा प्रदान करण्याच्या उद्देशाने दिवेआगार व हरिहरेश्वर समुद्रकिनाऱ्यांचे सुशोभिकरण करण्याचे ठरवले आहे. या ठिकाणी अत्याधुनिक पद्धतीचे मत्सालय आणि पर्यटक विश्रामगृह उभारले जाणार असून, त्याचप्रमाणे हरिहरेश्वर मंदिर प्रदक्षिणा मार्गाचे सुशोभीकरणदेखील प्रस्तावित आहे. या सर्व कामांचा मुख्य उद्देश श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन विकासाला चालना देणे आणि पर्यटकांना सर्वोत्तम अनुभव मिळवून देणे आहे.

या बैठकीला पर्यटन विभागाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज कुमार सूर्यवंशी, रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. लवकरच या विकास कामांचा प्रारंभ होईल आणि हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन क्षेत्राला नवा आयाम मिळेल, असे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले.

याप्रकारे, श्रीवर्धन तालुका येथील पर्यटन क्षेत्राचा विस्तार होणार आहे, ज्यामुळे स्थानिक रोजगाराच्या संधींना चालना मिळेल आणि पर्यटकांना आणखी आकर्षित केले जाईल.

## भारताचा ७६वा प्रजासत्ताक दिन


### महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

**रायगड: रामप्रहर वृत्त**

भारताच्या ७६व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त रायगड जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ रविवारी (दि.२६) महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते अलिबाग पोलीस मुख्यालय मैदान येथे सकाळी ९.१५ वाजता होणार आहे.

ध्वजारोहणाच्या वेळी राष्ट्रीय/समारंभीय पोषाख परिधान करण्यात यावा. नागरिकांनी, प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी या समारंभासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## माणगाव पोलीस ठाण्यात रक्तदान शिबिर



**माणगाव : बातमीदार**

माणगाव पोलीस स्टेशन येथे रस्ता सुरक्षा अभियान जिल्हा वाहतुक शाखा तसेच माणगांव पोलीस स्टेशन अंतर्गत गुरूवारी (दि.२३) माणगांव पोलीस स्टेशन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, पोलीस निरिक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, पोलीस कर्मचारी व सामाजिक बांधिलकी जपणारे युवा कार्यकर्ते यांनी या वेळी पुढे येऊन रक्तदान केले. या रक्तदान शिबिरात ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# पनवेलहून निघणार ‘विश्व शांती परिक्रमा’

**कर्जत : प्रतिनिधी**


रायगड जिल्ह्यातील दोन युवा दुचाकीस्वार त्यांच्या तीन सहकाऱ्यांसोबत येत्या २५ जानेवारी पासून पळस्पे – पनवेलयेथील महाऑटोव्हील्स येथून ६००० किलोमीटरच्या विश्व शांती परिक्रमेच्या प्रवासाला सुरुवात करणार आहेत.

पनवेल पळस्पे येथील अभिजित सिंह कोहली आणि कर्जतधील कुंदन सुळे हे रायगड जिल्ह्यातील दोन साहसी युवक अभिषेक नलावडे (ठाणे), अंबरीश पुल्ली (पुणे) आणि अजित माळी (सांगली) याआपल्या साथीदारां सोबत सुमारे २० दिवसांत भारतातील सहा राज्ये आणि नेपाळमधील काही ऐतिहासिक ठिकाणांना भेट देणार आहेत. या राईडमध्ये ते भगवान गौतम बुद्धांनी त्यांच्या जीवनकाळात वास्तव्य केलेल्या सर्व महत्वाच्या स्थळांना भेट देऊन तेथील इतिहास आणि बुद्धांनी दिलेला शांतीसंदेश सर्वत्र पसरवण्याचा प्रयत्न करणारआहेत.

या प्रवासात दुचाकी चालवताना स्वतःच्या सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे व वाहतुकीचे नियम पाळणे आदींचे महत्व लोकांना पटवून देण्यासाठी भेटीगाठी घेणार आहेत. या प्रवासाचा जागतिक शांती, रस्ते सुरक्षा यांसोबतच पर्यटन विकासाला सुद्धा मौलिक हातभार लागेल असा या तरुणांना विश्वास आहे. या उपक्रमाची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये करण्यासाठीही हे तरुण प्रयत्नशील आहेत. यापूर्वीही

अभिजित सिंह यांनी आझादी की अमृत परिक्रमा या राईडसाठी दोन इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तसेच हार्वर्ड वर्ल्ड रेकॉर्ड मिळवले आहेत. कुंदन सुळे यांनी 'भारत के वीर' या योजनेसाठी देणगी गोळा करताना ५५०० किमीची सुवर्ण चतुष्कोण राईड सारखे रेकॉर्ड मिळवले आहेत. त्यांनी नवी मुंबई महानगरपालिकेसोबत स्वच्छता अभियानासाठी गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये देखील भाग घेतला आहे. अभिषेक नलावडे यांनीही यापूर्वी

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांना एकाच राईडमध्ये भेट देऊन इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद केली आहे. असा अनुभवी संघ सोबत असल्यामुळे विश्व शांती परिक्रमा नक्कीच यशस्वी होईल आणि सर्व उद्दिष्टे पूर्ण होतील हा विश्वास कुंदन सुळे व अभिजित सिंह यांनी पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केला.





# पन्नास वर्षांपूर्वी मॅट्रिकला असणाऱ्या मित्रांचा मेळावा

**कर्जत : प्रतिनिधी**

अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेमध्ये सन १९७५ साली जुनी अकरावी म्हणजे त्याकाळातील मॅट्रिक मध्ये असलेल्या विद्यार्थ्यांना यंदा पन्नास वर्ष झाली. त्यानिमित्ताने सुवर्ण महोत्सवी स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे

सन १९७५ साली जुन्या अकरावीत असलेल्या विद्यार्थ्यांना पन्नास वर्ष होत आहेत. त्या निमित्ताने येथील रॉयल कॅम्प मध्ये सुवर्ण महोत्सवी मेळाव्याचे आयोजन केले आहे. हे सर्व वर्ग मित्र सकाळी आपण शिक्षण घेतलेल्या अभिनवमध्ये उपस्थित राहणार असून संस्था व शाळेला सन्मानपत्र प्रदान करुन समारंभाच्या ठिकाणी जाणार आहेत.

त्यांना शिकवित होत्या त्या सौ. उषा वैद्य प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते एक आठवण म्हणून प्रत्येक माजी विद्यार्थ्याला त्याने शाळा सोडल्यानंतर काय केले? याची माहिती असलेले सन्मानपत्र वैद्य बाईंच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. त्यानंतर वर्ग मित्र शाळेतील आठवणींना उजाळा देताना गप्पा मारणार आहेत.


**पनवेल महानगरपालिका**

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**अग्निशमन विभाग**

**अंदाजीत दरपत्रक मागणी सुचना**

याद्वारे सर्व व्यवसायीक / कंत्राटदार... इ. यांना सुचित करण्यात येते कि, पनवेल महानगरपालिकेच्या कार्यरत पनवेल तथा नव्याने हस्तांतरीत झालेल्या नविन पनवेल व कळंबोली अग्निशमन विभागाकरीता आपतकालीन परिस्थीतीत दळणवळणाचे बिनतारी माध्यम (वायरलेस) Walki- Talki संच तथा वारंवारता (Frequency) खरेदी करणे कामी अंदाजीय दरपत्रक मागणी करण्यात येत आहे.

याकामी सर्व ईच्छुकांनी सदर साहित्यांची यादी अग्निशमन विभागाकडुन प्राप्त करुन आपले दर बंद लिफाप्यात दि .२९/०१/२०२५ रोजी पर्यंत अग्निशमन विभागात सादर करावेत.

जा.क्र.:–पमपा/जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र. २३/२३/२०२५
दिनांक :– २३/०१/२०२५
ठिकाण :– पनवेल महानगरपालिका, पनवेल.

सही/–
(कैलास गावडे)
उपआयुक्त (मुख्यालय–I)
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटिस**

सर्व लोकांस या जाहीर नोटिस द्वारे कळविण्यात येते कि, **१) अनिल खंडू पाटील २) वामन खारकर** राहणार पोसरी गाव, पोस्ट - रसायनी, यांच्या नावे सामायिक मालकी हक्कात खालील वर्णन केलेली मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – रसायनी, तालुका– पनवेल, जिल्हा – रायगड,**

| भोगवटदार वर्ग | गट / सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे. |
|---|---|---|---|---|
| 2 | 70/1<br>70/2 | 41 | 4.700 Acre | 23.44 |

सदर मिळकत ही आमचे आशिलांनी खरेदीखताने कायम विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत हि उपरोक्त मालकांच्या सामायिक मालकी हक्कात असून 7/12 च्या उता-यावर त्यांच्याच नावाची नोंद आहे. वरील मिळकत सदरील मालकाने विक्रीसाठी काढली असून आमच्या आशिलाने वरील मिळकत खरेदीखताने कायम विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही पूर्णपणे बोजारहित, निर्वेध, बिनकर्जी, निजोखीम असून कोणत्याही कोर्टात अगर अधिका-यापुढे वादाचा विषय नसलेली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध, गहाण, दान, बक्षीस, अन्न, वस्त्र, लीज, एटचमेन्ट, वहिवाट, पोटगी, भाडेकरार, साठेकारार झालेला नसून सदरहू मिळकत ही सरकारी अगर निमसरकारी खात्याने संपादन केलेली नाही अगर रिझर्वेशन केलेली नसून विद्यमान मालकांना सदरहू मिळकत ही खरेदीखताने विकण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे व तसा भरोसा सदर मिळकतीच्या मालकांनी आमच्या आशिलांना दिला आहे.

तरी सुद्धा मिळकतीत अथवा त्यासंबंधीचा कोणाचाही, कसलाही, काहीही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती सर्व पुराव्यांसहीत ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून 11 दिवसांच्या आत खालील पत्यावर कळवाव्यात,तसे न कळविल्यास वरील मिळकत बोजाविरहित आहेत असे समजून, तत्संबंधी कोणाचेही, कसलेही हक्क,हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आमचे अशील वरील मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेल्या हरकती आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : 24/01/2025

सही /-
**ॲड. विजय आर. गरड**
पत्ता : 8/A, 2nd Floor,ब्यूमन चेंबर,
नगीनदास मास्टर रोड,
फोर्ट, मुंबई - 400023
मोबाइल नं.- 9769136262
Email id :- adv.vijaygarad@gmail.com
Advocate.vijaygarad@gmail.com



**जाहीर नोटीस**

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : MACP १७३१/२०२४**

**दादाराव शामराव बडोदेकर** — **अर्जदार**

**विरूद्ध**

**कोमल सुभाषचंद मौर्या** — **विरूद्ध पक्षकार**

**आणि**

**आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इन्शु. कंपनी लिमिटेड** — **विमाकार**

**प्रति,**
**कोमल सुभाषचंद मौरया**
**पत्ता–** फ्लॅट क्रमांक बी. 404, सावन ॲवबे 1, से. ५,
तळोजा पंचनंद, पी.एच १ प्लॉट ८७,
शहर रायगड, महाराष्ट्र - ४१० २०८.
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **०३–०३–२०२५** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **सदस्य श्रीमती. रहिमत कोंडेखान शेख** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस दिनांक **१८–०१–२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
सदस्य
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१


# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील साहित्याची विक्री

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड जि. रायगड या संस्थेतील वापरुन निर्लेखित झालेल्या साहित्याची विक्री जसे आहे त्या स्थितीत निविदा पध्दतीने करणे प्रस्तावित आहे. या मध्ये निर्लेखित झालेले यंत्रसामुग्री व उपकरणे इत्यादी साहीत्याचा समावेश असून इच्छुक जी.एस.टी. नोंदणीधारक खरेदीदारांनी निविदा सादर कराव्यात असे आवाहन प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड एन.एस.पुरकर यांनी केले आहे.

या निविदा प्रक्रियेकरीता लिफाफा पध्दतीने निविदा सादर करावयाची आहे. त्यासाठी फक्त जी.एस.टि. नोंदणीधारक खरेदी दारांकडून सिलबंद निविदा मागविण्यांत येत आहेत. विक्री करावयाच्या वस्तू संस्थेतील संबंधीत विभागामध्ये दिनांक २२/०१/२०२५ ते ३०/०१/२०२५ या कालावधीत सुटीचे दिवस वगळून सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत पहावयास मिळतील. याच कालावधी दरम्यान सादर करावयाच्या विहीत नमुन्यातील निविदा अर्ज ३०० रुपये (अक्षरी रुपये तीनशे मात्र) ना परतावा किंमतीत संस्थेच्या कार्यालयामधून विकत घेता येईल

इच्छुक जी.एस.टी. नोंदणी धारक खरेदी दारानी वर उल्लेख केलेल्या विहीत नमुन्यातील निविदा अर्ज डी.डी. सह (प्रपत्र अ व प्रपत्र ब करीता वेगळे स्वतंत्र लिफाफा द्यावा) ३०/०१/२०२५ सायंकाळी ५ वाजेपर्यन्त सुटीचे दिवस वगळून सिलबंद लिफाप्यात कार्यालयात जमा करावा.संपूर्ण निविदा प्रक्रीया रदद करण्याचा किंवा त्यामध्ये फेरबदल करण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड जि. रायगड यांनी राखून ठेवला आहे. संस्थेच्या प्राचार्याच्या कक्षात उघडण्यांत येतील.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ५९/२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक ०८/०१/२०२५ रोजी दैनिक मुंबई चौफेर, मुंबई, दैनिक मिड डे,मुंबई, दैनिक मुंबई तरूणभारत, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितरक्कम |
|---|---|---|
| १. | नागोठणे औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... नागोठणे येथील जलशुद्धीकरण केंद्र आणि कॉलनी परिसरात विकसित लॉन, बाग, झुडपे आणि वृक्षारोपणाची वार्षिक तत्वावर देखभाल करणे. | ₹ १६,१४,१७८.०० |
| २. | नागोठणे औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... नागोठणे येथील पंपांच्या स्ट्रेनर्सची पाण्याखालील साफसफाईची सेवा दोन कॅलेंडर वर्षांच्या कालावधीसाठी पुरविणे. | ₹ ११,८८,०००.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०३/०२/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**रोहा अष्टमी नगर परिषद**

ता. रोहा, जि.रायगड पिन कोड नं. ४०२१०९

फोन नं. कार्यालय – ०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८ email :rohanagarpalika@gmail.com

क्र. रोनप/आरोग्य/ज.हि.या–१५५/२०११/१४७८/२०२४–२५ दिनांक २३/०१/२०२५

**जाहीर सूचना**

रोहा शहरातील सर्व नागरिक, राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते यांना कळविण्यात येते कि, मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ३१ जानेवारी २०१७ चे आदेशान्वये रोहा अष्टमी नगर परिषद कार्यक्षेत्रामध्ये अनधिकृत जाहिराती यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. सदर कारवाईचा भाग म्हणून रोहा अष्टमी शहरात अधिकृत बॅनर, फ्लेक्स, पोस्टर्स इ. प्रकारच्या तात्पुरत्या जाहिराती लावणेसाठी खालीलप्रमाणे जागा निश्चित करण्यात आलेल्या असून बॅनर, फ्लेक्स, पोस्टर्स इ. लावणेसाठी जाहिरातीच्या आकारमानानुसार पूर्व परवानगी (ना हरकत दाखला) शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे.

| जाहिराती लावणेसाठी निश्चित करण्यात आल्या जागा | | नोडल अधिकारी यांचा तपशील | तक्रारीसाठी संपर्क |
|---|---|---|---|
| १) श्री राम मारुती चौक<br>२) तीन बत्ती नाका<br>३) जिजामाता चौक, दमखाडी<br>४) फिरोज टॉकीज समोर | ५) दगडी शाळा पूर्वेकडील भिंत<br>६) ब्लड बँके समोर<br>७) नगर परिषद कार्यालय समोर<br>८) आझाद चौक, अष्टमी | नोडल अधिकाऱ्यांचे नाव– श्रीमती. अस्मिता अनिल देशमुख, (नगररचना सहाय्यक) सहाय्यक नोडल अधिकाऱ्यांचे नाव श्री. मनोज प्र. पुलेकर (स्वच्छता निरीक्षक) | फोन नं. ०२१९४–२३५७३७, टोल फ्री क्र.– १८००५९९२४०० वेबसाईट– https://mahaulb.in ईमेल– rohanagarpalika@gmail.com SMS & WhatsApp मो.क्र. ८४४६१५२११२ |

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या नागरिक सुविधा केंद्रातून उपरोक्त नमूद ठिकाणी जाहिराती लावण्यास Integrated Web Based Portal (IWBP) द्वारे QR कोडसह परवानगी देण्यात येत असून सदर ठिकाणांव्यतिरिक्त जाहिरात धारकाकडून शहरात अन्यन्त्र तसेच QR कोड नसलेली जाहिरात लावल्यास अनाधिकृत ठरविण्यात येईल व नगर परिषद प्रशासनाद्वारे महाराष्ट्र मालमतेच्या विरुपणास प्रतिबंध अधिनियम, १९९५ नुसार दंडात्मक कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात येतील तसेच निष्कासनास येणारा खर्च देखील वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तरी रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरिक, राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी शहरात अनाधिकृत फ्लेक्स, बॅनर, जाहिराती, होर्डींग्स उभारू नयेत, जाहिरात धारकांनी रीतसर परवानगी घेऊनच QR कोडसह होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स, पोस्टर्स इ. लावावेत/ प्रसिद्ध करावेत. QR कोड विरहित माहिती फलक लावल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ वरील नमूद संपर्क क्रमांकावर अथवा SMS व Whats-pp क्रमांकावर अथवा ई–मेलद्वारे अथवा वेबसाईट अथवा प्रत्यक्ष, या कार्यालयास कळवावे व मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्यास प्रशासनास सहकार्य करावे.

सही/–
(अजयकुमार एडके)
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगर परिषद

# जेएनपीएमध्ये प्रकल्पांचे उद्घाटन, भूमिपूजन

## केंद्रीय मंत्री सोनोवाल यांची प्राधिकरणास भेट

**उरण : वार्ताहर**

बंदरे, जहाज वाहतूक व जलमार्ग मंत्री यांनी श्री सर्बानंद सोनोवाल यांनी काल जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणास (जनेप प्राधिकरण) भेट दिली, आपल्या भेटीदरम्यान त्यांनी जवळपास २००० कोटींच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन केले. केंद्रीय मंत्र्यांनी बंदराची सुरक्षा आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी एक सौरऊर्जेवर चालणारी बोट, दोन स्वदेशी विकसित ७० टी टग आणि तीन फायर टेंडरदेखील सुरू केले.



जानेवारी २०२५ मध्ये १०+ दशलक्ष टीईयू क्षमता ओलांडून जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जनेप प्राधिकरण) अव्वल जागतिक बंदरांपैकी एक आणि भारतातील सर्वात मोठे बंदर म्हणून पुढे आले असून २०२७ पर्यंत १० दशलक्ष टीईयूएस थ्रूपुट साध्य करण्यासाठी सज्ज आहे, असे सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितले. २०२४ मध्ये, बंदराने ९०% पेक्षा जास्त क्षमतेसह ७.०५ दशलक्ष टीईयूएस कंटेनरचे आतापर्यंतचे सर्वाधिक प्रमाण हाताळले. मागील कॅलेंडर वर्षाच्या तुलनेत गेल्या वर्षी त्याची वार्षिक वाढ ११% होती. जानेवारी २०२५ मध्ये भारत मुंबई कंटेनर टर्मिनल (बीएमसीटी)चा दुसरा टप्पा कार्यान्वित झाल्यानंतर, जनेप प्राधिकरणाच्या एकूण क्षमतेत आणखी २.४ दशलक्ष टीईयूएस जोडले गेले आहेत. २०२५ मध्ये न्हावा शेवा फ्री पोर्ट टर्मिनलच्या (एनएसएफटी) अद्ययावतीकरणामुळेही बंदराची क्षमता वाढण्याची शक्यता आहे. सध्याच्या दराच्या वाढीच्या अंदाजानुसार कंटेनर हाताळणी क्षमता १०.४ दशलक्ष टीईयूएस पर्यंत आहे.

आपल्या या पूर्वानुमानावर विश्वास व्यक्त करताना केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल म्हणाले, जनेप प्राधिकरणाच्या तसेच भारताच्या संपूर्ण सागरी क्षेत्रासाठी ही एक उल्लेखनीय कामगिरी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गतिशील नेतृत्वाखाली, आपल्या परिसंपत्तीवर घाम गाळून, कष्ट करून मूल्य निर्माण करण्याचा एकसंध प्रयत्न केला गेला आहे. त्याच वेळी आमची संपूर्ण टिम नाविन्यपूर्ण मूल्य प्रस्तावांसह क्षमता वर्धन करत निष्क्रिय संसाधनांमधूनही मूल्य निर्माण करण्यासाठी झटत आहे. वाढत्या पायाभूत सुविधांसह, मोठ्या जहाजांना हाताळण्याची क्षमता निर्माण करण्यासह, जनेप प्राधिकरण भारताच्या जागतिक व्यापाराचे प्रमुख प्रवेशद्वार म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यास तयार आहे. उत्पादन ते वस्त्रोद्योग, इलेक्ट्रॉनिक्स ते शेती अशा विविध क्षेत्रांपासून भारताचा व्यापार वाढत असताना, आपली बंदरे क्षमता निमार्ण कार्यात गुंतवणूक करत आहेत तसेच कंटेनरच्या वाढत्या वाहतुकीला आधार देण्यासाठी कार्यक्षम उपाय-योजना करत आहेत. एक कोटी टीईयूएस हाताळणाऱ्या जगातील मोजक्या बंदरांपैकी एक म्हणून जनेप प्राधिकरणाची लक्षणीय प्रगती हा नरेंद्र मोदी सरकारने २०१४ पासून भारताच्या सागरी क्षेत्राला जगातील सर्वोच्च सागरी देशांपैकी एक बनविण्याच्या दिशेने केलेल्या प्रयत्नांचा पुरावा आहे, असे आम्हाला वाटते.

**सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या**

*गोदाम सुविधा, बंदर सुविधा केंद्र आणि व्यवसाय सुविधा केंद्र विकसित करण्यासाठी सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. शिक्षणाद्वारे समुदायाच्या विकासासाठी बंदर परिसरात सीबीएसई शाळेच्या इमारतीच्या विकासासाठी सोनोवाल यांनी भूमिपूजनही केले.*

वाढवण बंदर प्रकल्पाच्या विकासासाठी केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या उपस्थितीत प्रमुख सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. वाढवण पत्तन प्रकल्प लिमिटेड (व्हीपीपीएल) आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्यातील सामंजस्य करारानुसार तरल घाटसह (लिक्विड जेट्टी) वाढवण बंदरात ५० एकर जमीन सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर (पीपीपी मॉडेल अंतर्गत) देण्यात आली आहे. ही गुंतवणूक अंदाजे ६४५ कोटी रुपये असून २०३० पर्यंत सुरू होण्याची शक्यता आहे. वाढवण आणि आसपासच्या डहाणू आणि पालघरमधील छोट्या गावांसाठी एकात्मिक कृषी आणि बागायती योजनेचा विकास आणि अंमलबजावणी करण्यासाठी व्हीपीपीएल आणि डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, (डीबीएसकेकेव्हीडी) यांच्यात आणखी एक सामंजस्य करार करण्यात आला. पायाभूत सुविधा क्षेत्रात सहकार्य वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून व्हीपीपीएल आणि हुडको यांच्यात एक मजबूत कार्यरत भागीदारी स्थापन करण्यात आली आहे. या भागीदारीचा उद्देश उभयपक्षांना नियंत्रित करणारे सर्व लागू कायदे आणि नियमांचे पालन करून समन्वय, सहकार्य आणि संसाधनांची देवाणघेवाण वाढवणे हा आहे. या कराराचा एक भाग म्हणून, मेसर्स हुडको नवीन बंदरे तसेच सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) प्रकल्पांच्या विकासासाठी २५,००० कोटी रुपयांपर्यंत निधी पुरवण्यासाठी वचनबद्ध आहे. ही धोरणात्मक युती मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा प्रकल्प राबविण्यात व्हीपीपीएलच्या कौशल्याचा आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात प्रभावशाली उपाय देण्यासाठी हुडकोच्या आर्थिक कौशल्याचा लाभ घेते. ही भागीदारी शाश्वत पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्याच्या व्यापक दृष्टिकोनाशी सुसंगत आहे आणि भारताच्या आर्थिक वाढीस आणि जागतिक स्पर्धात्मकतेला चालना देत बंदर विकास आणि इतर संबंधित प्रकल्पांमध्ये लक्षणीय प्रगतीला चालना देईल, अशी अपेक्षा आहे.




## विद्यार्थ्यांनी आपले आवडीचे क्षेत्र निवडावे -किसनराव पालांडे

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या विद्याभवन शिक्षण संकुलात माध्यमिक मराठी आणि ज्युनिअर कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभास उपस्थित नवी मुंबई महापालिकेचे समाजविकास विभागाचे उपायुक्त किसनराव पालांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या आवडीचे क्षेत्र निवडण्याचा सल्ला दिला.

शिक्षण हे फक्त नोकरीसाठी नसून जीवन चांगले जगण्यासाठी आहे. चांगली संगत, सोशल मीडियाचा मर्यादित वापर, वेळेचे नियोजन व शिस्त आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी असल्यास यश नक्कीच मिळते असे विचार पलांडे यांनी व्यक्त केले. त्यांनी महानगरपालिका राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली आणि त्याचा उपयोग करून घेण्याचे आवाहन केले. पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रगतीकडे लक्ष ठेवून सामाजिक उत्तरदायित्व जपावे असा सल्ला त्यांनी पालकांना दिला.

या कार्यक्रमात सहशालेय स्पर्धा आणि क्रीडा स्पर्धांतील विजेत्यांना गौरविण्यात आले. पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे, समाजसेवक देवाप्पा लवटे, सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक मोहन पाटील, मुख्याध्यापक गोरख कदम, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर, समन्वयक पांडुरंग मुळीक, पालक प्रतिनिधी रेश्मा कदम तसेच सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

## काळभैरवनाथ मंदिरातील दानपेटी फोडली

**पनवेल :** कळंबोली गावातील काळभैरवनाथ मंदिरातील दानपेटी फोडून चोराने पैशांची चोरी केली. चोरी करताना चोर सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे.

रविवारी १९ जानेवारी रोजी चोराने कळंबोली येथील मंदिरातील दानपेटी फोडली. दानपेतट्या वर डल्ला मारण्याचे काम चोरटे अनेकदा करतात. पनवेल तालुक्यातील अनेक मंदिरातून यापूर्वी देखील दानपेटीतील रक्कम चोरीला गेल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. असाच प्रकार कळंबोलीत घडला. सीसीटीव्ही कॅमेरे असूनदेखील चोराने दानपेटी फोडून रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी कळंबोली पोलीस अधिक तपास करत आहेत.

## सिडकोचे महागृहनिर्माण योजनेच्या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या माझे पसंतीचे सिडकोचे घर महागृहनिर्माण योजनेकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यासह सदनिकांचा प्राधान्यक्रम निवडण्याकरिता दिनांक ३१ जानेवारी २०२५ पर्यंत अखेरची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या तारखेपर्यंतच ही सुवर्णसंधी उपलब्ध असल्याने, जास्तीत जास्त नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे.




सिडकोतर्फे सादर करण्यात आलेल्या माझे पसंतीचे सिडकोचे घरया महागृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईच्या वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाकरिता २६,००० सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अर्जदारांना आपल्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य हे या योजनेचे वैशिष्ट्य आहे. या योजनेतील घरे ही सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरातील असून नवी मुंबईतील मोक्याच्या ठिकाणी हे सर्व गृहप्रकल्प साकारण्यात आले आहेत.

अर्जदारांना आपले पसंतीचे सिडकोचे घर निवडताना मदत होण्यासाठी सिडकोतर्फे योजनेतील सदनिकांचे स्वरूप पाहता यावे याकरिता खारघर, सेक्टर-१४, खारघर (पूर्व) तळोजा, सेक्टर-३७ व खांदेश्वर, सेक्टर-२८ येथे अनुभूती केंद्रांची स्थापनाही करण्यात आली आहे. या केंद्राना भेट देऊन नागरिक आपले स्वप्नातले घर सत्यात कसे दिसेल याचा सुखद अनुभव घेऊ शकतात.

३१ जानेवारी २०२५ या तारखेपर्यंतच ही सुवर्णसंधी उपलब्ध असल्याने अर्जदारांनी ऑनलाइन अर्ज नोंदणीकरिता https://cidcohomes.com या संकेतस्थळाला भेट देऊन अर्ज नोंदणी करून सदनिकांचा प्राधान्यक्रम निवडावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.


## प्रारूप विकास आराखड्यात नेरूळ सेक्टर २ व ४साठी निधी राखीव ठेवावा

### भाजपच्या सुहासिनी नायडू यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यामध्ये आम्ही केलेल्या पाठपुराव्यामुळे प्रभाग क्र. ८४, येथे स्पोर्ट्स कॉप्लेक्स, पब्लिक अमेनिटी सेंटर व फायरब्रिगेडची इमारतही तरतूद मान्य झाली आहे.

स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससाठी लागणारा भूखंड व फायर ब्रिगेड इमारतीसाठीचा भूखंड हा सिडकोने याआधीच महागरपालिकेला हस्तांतरित केला आहे. या इमारती तसेच इतर वास्तू व नागरी सुविधा उभारण्यासाठी जवळपास २४ ते २५ कोटींचा निधी लागणार आहे. आगामी अर्थसंकल्पात याबाबत पालिकेने तरतूद करून निधी राखीव ठेवावा, अशी मागणी भाजपाच्या सुहासिनी नायडू यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.



प्रारूप विकास आराखड्यात नमूद केल्याप्रमाणे ह्या दोन्ही सोयीससुविधांसाठी प्रस्तावित खर्च नेरुळ येथील सेक्टर -४, भूखंड क्रं. एन-१९, पब्लिक अमेनिटी इमारत तीन कोटी ६५ लाख रुपये सेक्टर-२, भूखंड क्र. १०, फायर स्टेशन, १३ कोटी १८ लाख रुपये आणि सेक्टर २. भूखंड क्र. ११, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, चार कोटी नऊ लाख इतका निधी राखीव करावा. त्याचप्रमाणे सेक्टर- २. नेरूळ, प्रभाग येथील अंडरग्राउंड पाईप लाईन नूतनीकरणासाठी साधारण दोन कोटी रुपये तरतूद करावी, त्याचप्रमाणे सेक्टर ४ येथील वाधवा सोसायटी ते शिया मुसलमानांच्या स्मशानापर्यंत कंपाउंड वॉलसाठी ८६ लाख रुपये, त्याचप्रमाणे सेक्टर ४ येथील स्मशनासमोरील नाल्यालगत ओव्हरहेड केबलच्या ठिकाणी अनधिकृत नर्सरी काढून तेथे उद्यान तयार करावे व त्यासाठी पाच कोटी इतक्या निधीची तरतूद करावी.

सर्व निधीची तरतूद करून सर्व प्रस्तावित कामे पूर्ण करून सेक्टर २, व सेक्टर ४, नेरूळ येथील नागरिकांसाठी सुविधा निर्माण करून द्याव्यात, अशी मागणी सुहासिनी नायडू यांनी केली आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील गुळसुंदे येथील तुंगारतन विभाग विद्यामंदिरात दहावीच्या वर्गातील सन १९९२ सालातील माजी विद्यार्थी ३३ वर्षांनंतर एकत्र येत देवळोली उसराई मातेचे दर्शन घेतले.



यानंतर माजी विद्यार्थ्यांत जुन्या आठवणींना उजाळा दिला. दहावीच्या वर्गातील मित्र ३३ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आल्याने आपापली जीवनकथा एकमेकांसमोर शेअर केल्या आणि समाजिक बांधिलकी म्हणून गोरगरीबांना सहकार्य करायचे ठरले. या वेळी रसायनी विभागातील रायगड जिल्हा परिषद शाळांतील आदीवासी व गरजू विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले. या वेळी नारायण पाटील, धनाजी पाटील, भरत पाटील, सुरेश पवार, सुनील गोडीवले, महेंद्र पेलणेकर, राकेश पाटील, मनोहर राठोड, दत्ता माळी, हनुमान माळी,संजय माने, निळकंठ भोईर, दिलीप भालेराव, धनाजी गायकवाड, विष्णू मेढेकर, विष्णू गायकर, संतोष भोईर, सुनील पाटील, गणेश कंटे, भास्कर म्हस्कर आदींसह माजी विद्यार्थी उपस्थित होते.

## तब्बल २४ वर्षानंतर विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन

**चिरनेर : प्रतिनिधी**

ए.एस.सी. महाविद्यालय फुंडे कॉलेजच्या विज्ञान शाखेच्या टी वाय बीएससीच्या २००० ते २०२१च्या रसायन शास्त्र व प्राणी शास्त्र बॅचच्या विद्यार्थी विद्यार्थिनी स्नेहमेळावा कार्यक्रमानिमित्ताने रविवारी (दि.१९) कोप्रोली येथील फार्म हाऊसवर तब्बल २४ वर्षानी एकत्र आले आणि कॉलेजच्या जुन्या गोड आठवणींना उजाळा दिला.



हा स्नेहमेळावा कार्यक्रमात बीएससीच्या प्रत्येक मित्र मैत्रिणीने सहभाग घेतला आणि कॉलेज जीवनाबरोबर आपल्या आयुष्यातील सुखदुःखाच्या आठवणी जाग्या केल्या. या वेळी ज्ञानाचे धडे देणाऱ्या तत्कालीन गुरुजनांबद्दल विद्यार्थी मित्रांनी आदर व्यक्त केला. तसेच या वेळी गुरुवर्य रोकडे सर, विद्यार्थी मित्र दिनेश म्हात्रे व गैनीनाथ यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या वेळी अमित मुंबईकर यांनी बासरी वादन करून सर्वांनाच मंत्रमुग्ध केले. दरम्यान, या स्नेहमिलन बॅचतर्फे विशेष लकी ड्रॉ आयोजित करण्यात आला होता. यात व्यंकटेश व कल्पना ठाकूर या लकी ड्रॉ च्या मानकरी ठरल्या. त्यांना सन ग्लास गॉगल भेट देऊन सन्मानित करण्यात आले. तर बीएससी बॅचचे विद्यार्थी मित्र चेतन म्हात्रे व आरती मोहोकर यांच्या सौजन्याने प्रत्येक विद्यार्थी मित्राला बॅचचा लोगो किचेन हा आठवण म्हणून भेट देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी टीवाय बीएस्सी बॅचच्या सर्वच विद्यार्थी विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले.

## नेरूळ येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सालाबादप्रमाणे यंदाही सलग २३व्या वर्षी श्री संत वामनभाऊ व भगवानबाबा प्रतिष्ठान, नेरुळ, नवी मुंबई यांच्या वतीने १४ ते २२ जानेवारी २०२५ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी दिंडी पारायण सोहळा भाजप, नवी मुंबई माजी जिल्हा अध्यक्ष व भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य भगवानराव ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली गांवदेवी मंदिर, नेरुळगांव येथे भक्तिमय वातावरणात झाला.



महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार महाराजांच्या किर्तनरुपी अमृततुल्य सेवेचा आणि महाप्रसादाचा हजारो वैष्णव भाविकांनी लाभ घेतला. सप्ताह सोहळ्यात आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिराचा भक्तगणांनी लाभ घेतला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष निवृत्ती गर्जे, सचिव महेंद्र जायभाये, खजिनदार भगवान बटुळे, बबन खेडकर, महादेव खाडे, सुधाकर गर्जे यासह कार्यकारिणी सदस्य यांनी मेहनत घेतली.

## क्लिक...क्लिक...!

(छाया : सुधीर नाझरे)



**मुरूड : समुद्रकिनारी सप्टेंबर महिन्यात आलेले सीगल पक्षी आता जाण्याच्या मार्गावर लागलेत हळूहळू संख्या कमी होत आहे आणि जाताना या पक्षाचे पंख काळे होतात.**

## पल्लवी परदेशींना राष्ट्र निर्माता पुरस्कार

**उरण : बातमीदार**

रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटी नवी मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा समाजातील राष्ट्र निर्मिती करता करण्यात येणाऱ्या कामाच्या व सेवेच्या आधारावर नेशन बिल्डर अवॉर्ड देण्यात येत असतो. या वर्षाचा नेशन बिल्डर अवॉर्ड उरण तालुक्यातील स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान सी बर्ड स्टेशन मुलांची शाळा उरण या शाळेतील मुख्य शिक्षिका पल्लवी संतोष परदेशी यांना मिळाला आहे.



हा पुरस्कार मिळाल्याने पंचक्रोशीतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. २००९ पासून या शाळेमध्ये विशेष शिक्षिका म्हणून काम करत आहेत. मुलांचा सर्वांगीण विकास तसेच त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्याचे कौशल्य आणि मुलांना आत्मनिर्भर करणे हा त्यांच्या कामातील एक महत्त्वाचा भाग आहे. त्यांना त्यांच्या कामानिमित्त कर्तुत्वान महिला, उरण भूषण, आदर्श शिक्षिका इत्यादी पुरस्काराने त्यांना आज पर्यंत सन्मानित करण्यात आहे आहे. त्यांना नेशन बिल्डर अवॉर्ड २०२५ने सन्मानित करत असताना पुन्हा एकदा त्यांच्यावर समाजाने राष्ट्र निर्मितीची पुन्हा त्यांना संधी दिली आहे.

हा पुरस्कार दिनेश मेहता-डिस्टिक गव्हर्नर रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटी नवी मुंबई सीबीडी बेलापूर यांच्या हस्ते १९ जानेवारी २०२५ रोजी बेलापूर येथील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स येथे मोठ्या दिमाखात प्रदान करण्यात आला.

# टीकाकारांमुळे आपल्याला फायदा जास्त होतो -खासदार सुनील तटकरे



**नागोठणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह देशातील पत्रकार आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचा वसा चालवीत असून पुढच्या काळातदेखील निश्चितपणे चालवीला जाईल, असा विश्वास संसदीय पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस कमिटीचे अध्यक्ष व विद्यमान खासदार सुनील तटकरे यांनी नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचा वर्धापन दिनी व्यक्त केला.

नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचा बारावा वर्धापन दिन ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रगणात बुधवारी (दि.२२) उत्साही वातावरणात पार पडला त्यावेळी खासदार तटकरे उपस्थित जनसमुदायास मार्गदर्शन करताना म्हणाले की, पत्रकार ज्या वेळी समाजामधील खरे वास्तव मांडण्याचा प्रयत्न करतात त्यावेळी काही अशा प्रवृत्ती असतात त्यांना लिहलेले सहन करण्याची ताकद नसते. मी माझ्या आयुष्यभरामध्ये माझ्यावरती गौरवाने लिहलेलेसुद्धा स्वीकारले. माझ्यावर ज्यावेळी टीका झाली त्यावेळी सुद्धा मी आनंदाने स्वीकारले. मी कधी कुणावर आक्षेपाने बोललो नाही. त्याने लिहीलेले आपल्यासाठी उदबोदक असले पाहिजे या विचाराच्या माध्यमातून टीकाकराकडे पहिले त्याचा फायदा लिहणाऱ्यापेक्षा आपल्याला होत असतो या विचारधारेने मी गेले चाळीस वर्ष सार्वजनिक व राजकीय जीवनात वावरत आलेलो असल्याचे सांगितले

यावेळी शिवसेना ( उबाठा ) जिल्हा सहसंपर्क प्रमुख किशोरभाई जैन, राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, हरीष काळे, नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, अ.भा.म.पत्रकार परिषद अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष मनोज खांबे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, राष्ट्रवादीचे नेते शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सोपानभाऊ जांबेकर, नागोठणे माजी सरपंच विलास चौलकर, डॉ. मिलिंद धात्रक, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, भाजप शहर अध्यक्ष सचिन मोदी आदी मान्यवरांसह ग्रामस्थ महिला वर्ग व असोसिएशनचे हितचिंतक उपस्थित होते.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून कै. तात्यासाहेब टके ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार अलिबाग येथील पत्रकार बळवंत वालेकर, उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार खालापूर येथील पत्रकार प्रशांत गोपाळे व युवा पत्रकार पुरस्कार पनवेल येथील पत्रकार साहिल रेळेकर यांच्या सह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले के,के. कुथे भाऊसाहेब, विलास चौलकर, रमेश धनावडे, एम.के.पाटील सर, अंकुश कांबळे सर, वर्षाताई जांबेकर, किशोर शिर्के, दत्तात्रेय मढवी, निडी, संतोष ताडकर, कुमारी. प्रांजल गणेश घांगुर्डे, जय शेखर गोळे यांना खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच या वेळी असोसिएशनच्या संकल्प या स्मरणीकेचे व आठवणीतील तात्यासाहेब या पुस्तकाचे प्रकाशन खासदार तटकरे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन असोसिएशनचे अध्यक्ष महेश पवार यांनी तर सूत्रसंचालन सुवर्णा चव्हाण यांनी केले.

## मनुष्य जीवन अमूल्य आहे -उदय घाग

**चौक: प्रतिनिधी**

मनुष्य जीवन अनमोल आहे, त्यासाठी जीवनात घडणाऱ्या वैद्यकीय घटनांच्यासाठी आम्ही बांधील आहोत, हीच सेवा जिवनात महत्वाची सेवा आहे, असे प्रतिपादन अल्काईल अमाइन्स चे सी.एच.आर. ओ. उदय घाग यांनी केले.

चौक ग्रामीण रुग्णालयात शस्त्रक्रिया विभागाचे संपुर्ण नूतनीकरण आणि सुसज्ज उपकरणे अल्काईल अमाइंस कंपनी पाताळगंगा यांच्या सी.एस.आर.फंडातून देण्याचा कार्यक्रम चौक ग्रामीण रुग्णालयात करण्यात आला, त्या प्रसंगी ते बोलत होते. .

ते पुढे म्हणाले येथिल वैद्यकीय अधिक्षक डॉ.सविता कालेल यांच्या सततच्या.प्रयत्नाने आणि येथे रुग्णांना मिळणाऱ्या सेवेमुळे आमचे सहकार्य लाभले आहे. चौक ग्रामीण रुग्णालय येथे मिळणाऱ्या सेवेमुळे रुग्णांची संख्या लक्षणीय वाढली आहे,येथील वैद्यकीय अधिकारी,कर्मचारी हे रुग्णांच्या सेवेत असल्याचे सिप्ला कंपनीच्या धुरी यांनी सांगून वैद्यकीय अधिक्षक डॉ. सविता कालेल यांनी काया कल्प हे अभियान यशस्वी केल्याचे सांगितले.अल्काईल कंपनी आम्हास नेहमी सहकार्य करते, त्यामुळे त्यांचे आभार व्यक्त करणे गरजेचे असल्याचे यावेळी वैद्यकीय अधिक्षक डॉ.सविता कालेल यांनी सांगितले.

कार्यक्रमास जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अंबादास देवमाने, . उदय घाग, सिनियर मॅनेजर एच.आर.मॅथ्यू डी' कुन्हा, वर्क्स मॅनेजर नागनाथ खटकाळे, अर्चना माने, सी.एस.आर.ऑफिसर निकिता म्हात्रे, अधिकारी भास्कर भिंगारे, सी.एस.आर. कन्सल्टंट रवींद्र ओंकार, गणेश कदम उपस्थित होते.



## मुंबई-गोवा महामार्गावर अपघात

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

गोरेगाव पोलीस ठाणे हद्दीत मुंबइ -गोवा महामार्गावर टेमपाले हद्दीत कार आणि ट्रकच्या अपघातात कारमधील प्रवासी जखमी झाला आहे.

सोमवारी रात्री १० वाजता टेमपाले हद्दीत कियाकार घेउन महाडकडे जात असतांना समोरून येणाऱ्या ट्रकच्या चालकाने भरधाव रॉंग बाजुने येउन धडक दिली. या अपघातात कारमधील विनायक चंद्रकांत बुचडे हे गंभीर जखमी झाले.

याबाबत गोरेगाव गोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.असून अधिक तपास पोह/प्रदीप घोडके हे करीत आहेत.

## वाहन नोंदणीसाठी एमएच ४६ सीएक्स नवीन मालिका सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांच्या कार्यकक्षेमधील वास्तव्य करणाऱ्या तथा व्यवसायाचा पत्ता असलेल्या व परिवहनेतर संवर्गात वाहन नोंदणी करू इच्छिणाऱ्या वाहन धारकांकरीता V-H-N ४.० या संगणक प्रणालीवर सद्यस्थितीत कार्यन्वित असणारी एम एच ४६ सीडब्ल्यू ही मालिका संपुष्टात येणार असल्याने एम एच ४६ सीएक्स ही नवीन मालिका सुरू करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५४ (अ) अन्वये नवीन नोंदणी मालिकेतील आकर्षक व




पसंतीचे नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करून सदर क्रमांक आरक्षित करण्यासाठी इच्छुक नागरीकांकडून दिनांक २२ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ या कार्यालयीन वेळेमध्ये अर्ज स्विकारले जातील, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी प्रतिनिधी असतील तर संबंधीत प्रतिनिधीस प्राधिकृत केल्याबाबतचे विहीत प्राधिकारपत्र अर्जासह सादर करणे बंधनकारक आहे.

## वासांबे येथे माझी वसुंधरा ५.० योजनेंतर्गत मार्गदर्शन शिबिर

**रसायनी :** ग्रुप ग्रामपंचायत वासांबे येथे माझी वसुंधरा ५.० योजने अंतर्गत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी सरपंच उमा मुंढे, सुभाष राठोड (तालुका समन्वयक) यांनी भूमी, वायू, जल, अग्नि, आकाश या तत्त्वांमध्ये करण्याऱ्या कामाची माहिती दिली. या सभेस ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, ग्रामपंचायत सदस्या, ग्रामपंचायत समन्वयक रजनी गायकवाड व ग्रामपंचायत वासांबे हद्दीतील सर्व शिक्षक, सीआरपी, बचत गट अध्यक्ष, अंगणवाडी सेविका व आशा सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## मुरूड तालुक्यात स्वामित्व योजना कार्यान्वित

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात स्वामित्व योजना कार्यान्वित झाली आहे. साळाव ग्रामपंचायतीस स्वामित्व योजनेच्या लाभाचा प्रथम बहूमान प्राप्त झाला असून अंतर्गत ग्रामस्थांना प्रॉपर्टी कार्डचे वाटप कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

मुरूड तालुक्यात गावठाण जागेचे सर्वेक्षण झाले असून स्वामित्व प्रॉपटी कार्ड वाटप कार्यक्रम नुकताच साळाव येथे राबविण्यात आला. साळाव ग्रामपंचायतीच्या कार्यालयातील सभागृहात स्वामित्व प्रॉपर्टी कार्ड वाटप लाभार्थीना करण्यात आले. स्वामित्व प्रॉपर्टी कार्ड वाटप योजनेअंतर्गत देशभरातील साडेतीन लाख ग्रामस्थांना



आता पर्यंत प्रॉपर्टी कार्ड वाटप करण्यात आले आहे. साळाव ग्रामपंचायतीच्या कार्यालयातील सभागृहात लाभार्थी ग्रामस्थांना स्वामित्व प्रॉपर्टी कार्ड वाटप माध्यमातून भुसंपादन सनदीचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी साळाव ग्रामपंचायतीचे सरपंच वैभव कांबळी, उपसरपंच दिनेश बापळेकर, ग्रा.प.सदस्य दत्ता पाटील, ग्रा.प.सदस्या शितल वाणी, तसेच मुरूड तालुका विस्तार अधिकारी अशोक दांडेकर, तालुका कृषी विस्तार अधिकारी वसंत दळवी, निमतनदार मिथून पोकळे, अभिलेखपाल मयुर सिंगलवार,तसेच साळाव ग्रामपंचायत अधिकारी आशा बिरवाडकर,साळाव ग्रामस्थ व ग्रा.प.कर्मचारीवर्ग यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे निमित्ताने भुमिअभिलेख तालुका निमतनदार मिथुन पोकळे यांनी मार्गदर्शन करताना ग्रामस्थांना सनद खुप महत्वाची असल्याचे पटवून दिले तसेच मुरूड तालुक्यात एकूण ७६ महसुली गावामध्ये ५६ गावाचे ड्रोन सर्वे झाले असून त्यातील दोन गावाची भुसंपादन सनद तयार झाली आहे. पुनस्यः ड्रोन सर्वे कार्यक्रम हाती घेण्यात येणार असून मुरूड तालुक्यातील सर्व गावामध्ये सर्वेक्षण हाती घेण्यात येईल अशी माहिती त्यांनी दिली.

या कार्यक्रमाचे निमित्ताने ग्रामपंचायत साळाव अंतर्गत वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेण्यात आला तसेच ग्रामस्थांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली, तसेच नशामुक्त ग्रामपंचायत होण्यासाठी नशा मुक्त शपथ कार्यक्रमसुध्दा संपन्न झाला.

## क्रिसिल फाऊंडेशनचा अनोखा उपक्रम योजनांची दिली माहिती

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील न्हावे, सोनखार व नवखार अशा विविध ठिकाणी क्रिसिल फाऊंडेशन मनीवाईज सेंटर रोह्याच्या वतीने नागरिकांना बँकेच्या योजनांची माहिती देण्यात आली

हा उपक्रम सलग दोन दिवस चालू होता. तसेच शासनाच्या स्त्री पुरुष सुरक्षा योजना, जिवन ज्योती, अटक पेंशन योजना, अशा योजनांचा लाभ घेण्यासाठी जवळपास २५० पेक्षा अधिक नागरिकांचे कागदपत्रे चणेरा येथील बँक ऑफ बडोदा येथे फार्म लिंक करण्यात आले. नागरिकांना फसवणूकीच्या दृष्टीने साक्षरता, डिजिटल पेमेंट, आँनलाईन



फसवणूक कशा पद्धतीने केली जाते ती रोखण्यासाठी काय केले पाहिजे, अशा गोष्टींची माहिती फाउंडेशनच्या वतीने देण्यात आली.

या अनोख्या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ४०० पेक्षा अधिक ग्रामस्थांनी या उपक्रमात सहभागी झाले होते. या वेळीया कॅम्पसाठी कोकण रिजन असिस्टंटन एरिया मॅनेजर सुप्रिया पाशीळकर मॅडम, सेंटर मॅनेजर, संजीवनी जयेश माने मॅडम, अश्विनी डबीर व सारिका पाटील उपस्थित होत्या.

## वणवे सुरूच! तरव्यांनी होरपळणार पोलादपूर तालुका

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यात मार्गशीर्ष महिन्यापासून सुरू झालेले वणवे आता पौष महिन्याच्या मध्यावरही सुरू असून पारंपरिक शेतीचा एक अविभाज्य भाग म्हणून शेतात जाळले जाणारे तरवे झळ सोसावयास लावणार आहेत. वनविभागाला गेल्या अनेक वर्षांमध्ये वणवा प्रतिबंधक सप्ताहाचे आयोजन करण्यापलिकडे जनजागृती करण्यात यश आले नसून कृषी विभागालाही शेतात तरवे जाळण्यास प्रतिबंध करण्याकामी यश आले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

महाबळेश्वर रस्त्यावर दोन वर्षांपूर्वी डोंगरावरील गवत व छोटी झाडे पेटविण्यासाठी जळक्या कापडी चिंध्या लावलेली लाकडं फेकणारे मोटारसायकलस्वार मोबाईल शूटींगमुळे उघडकीस आले होते. त्यामुळे वणवे मानवनिर्मित की नैसर्गिक या चर्चा आजतागायत वणव्यांप्रमाणेच सुरू आहेत.

पोलादपूर तालुक्यात कवळं



काढून राब पेटविण्याचा हंगाम आता सुरू झाला आहे. अनेक शेतामध्ये शेण, फांद्या, पानं असा राब अंथरला गेला आहे. यात सागवानी झाडांच्या पानांचा आणि कोवळया फांद्यांचा राबामध्ये जास्त उपयोग झाल्याचे दिसून येत आहे. यालाच कवळं काढणे असे म्हणतात. यामुळे सागाची झाडं बोडकी झाल्याचेही दृश्य सर्वत्र दिसून येत आहे. एकीकडे सागाची पाने जमिनीमध्ये विघटित होऊन त्यांचे मातीत रूपांतर होण्यास जास्त अवधी लागत असल्याचे कृषीविज्ञान सांगते. त्यामुळे साग माफियांना हा हंगाम शेतीच्या मशागतीच्या निमित्ताने सागाची अवैध वृक्षतोड करण्यास प्रोत्साहित करणाराही ठरत आहे. शेतात तरवे म्हणजेच राब जाळण्यास कृषी विभागालाही शेतकऱ्यांना प्रतिबंध करण्यात यश आले नाही.

सवाद येथे एका गवताची उडवी जळण्याचा तर कापडे फौजदारवाडीसह धामणदिवी, सडे, सवाद, कोतवाल बुद्रुक आणि कोंढवी येथे वाडा जळून गुरे होरपळल्याच्या दूर्घटना गेल्या दोन वर्षांत झाल्या आहेत. तालुक्यात संध्याकाळी उंच डोंगरावर विद्युत रोषणाई केल्यासारखे वणव्यांचे दृश्य मनोहारी दिसत असले तरी हे वणवे भर दुपारी जेव्हा पेटतात तेव्हा पाणी टंचाई असलेल्या या तालुक्यात शेतकऱ्यांना त्यावर नियंत्रण ठेवणे देखील अशक्य होत आहे.

पोलादपूर तालुक्यातील माळरानावरील गवताचे प्रमाण पाहता ते तालुक्याला पशुधन संगोपनासाठी दुधदुभता तालुका अशी ओळख देण्यास उपयुक्त आहे. पावसाळी पिक घेऊन झाले की जमीन ओलसर असतानाच शेताची नांगरणी केल्यानंतर सूर्यप्रकाश आणि सूर्यकिरणे थेट जमिनीत मातीमध्ये शिरून माती भुसभूशीत होण्यास मदत होतेच; पण यासोबतच नंतरच्या पिकासाठी पोषक अशा सिलीकॉनीयस द्रव्याची निर्मिती होऊन पिके जोमाने वाढतात; हा कृषी विज्ञानाचा शोध तालुक्यातील तापमान वाढीसोबतच धूरामुळे होणाऱ्या प्रदुषणावरही नियंत्रण मिळविण्यास साह्यभूत ठरणार आहे.

मुंबईसह देशातील तबेल्यांमध्ये गवतपुरवठा करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना साथ देणाऱ्या पोलादपूरकरांना गवताचा आणि मेहनतीचाही पैसा मिळाला नव्हता; त्यामुळे गवतकापणीसाठी कोणीही अनूकूल नाही. शेतकरी भातशेती आणि रबी हंगामातील भाजीपाल्याखेरिज कोणतेही उत्पादन घेत नसल्याने अन्य शेतकरी बांधावरील गवत कापायलादेखील शेतावर या हंगामात फिरकत नाहीत.

## प्लास्टिक पिशव्या बाटलीत बंद करा; हेल्प फाऊंडेशनचे आवाहन

**चौक : प्रतिनिधी**

प्लास्टिक पिशव्या प्लास्टिक बाटलीत भरून बंद करा त्यामुळे आपल्या अवधानाने होणारे प्राणी पक्षी आणि जलचरांचे जाणारे जीव टाळता येतील असे आवाहन हेल्प फाऊंडेशन रायगड यांनी केले आहे.



आज प्रत्येक घरात दररोज किमान १० ते २० प्लास्टिकच्या पिशव्या वेगवेगळ्या मार्गाने म्हणजे तेलाची, दुधाची, किराणा, शाम्पू, साबण, मॅगी, कुरकुरे इ. रूपाने घरात प्रवेश करतात. या पिशव्या आपण दररोज डस्टबिन ऐवजी वापरलेल्या पाण्याच्या बाटल्यांमध्ये भरून ठेवल्यास व आठवड्यातून एकदा बाटली भरून व्यवस्थित झाकण लावून डस्ट बिनमध्ये टाकल्यास वाऱ्याने इतस्ता फिरणार नाहीत, त्यामुळे त्या कुठेही विखुरलेल्या स्वरुपात दिसणार नाहीत.

हल्ली पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या घरात येतात, शिवाय रिकाम्या बाटल्या सहज उपलब्ध होतात. असे केल्याने जनावरे विखुरलेले प्लास्टिक खाणार नाहीत. प्लास्टिक कचरा आणि पाण्याच्या बाटल्यांची योग्य विल्हेवाट लावण्याची संधी मिळेल. स्वच्छता विभागालाही कचरा उचलणे सोयीचे होईल. बाटल्या आणि प्लॅस्टिक पुनर्वापरासाठी किंवा इको ब्रिक्स म्हणून वापरल्या जाऊ शकतात. यापासून बेंच, भांडी किंवा सजावटीच्या वस्तू देखील बनवता येतात. आपण वापरलेले प्लास्टिक प्राणी, पक्षी आणि जलचर यांच्यासाठी घातक ठरणार नाहीत,

# नमो चषक 2025

























११वे पुण्यस्मरण
॥ सहवास जरी सुटला, स्मृती सुगंध देत राहिल
आयुष्याच्या वळणावर आठवण तुमची येत राहिल ॥

स्व. कमळाकर काशिनाथ पाटील
(मृत्यू : २४ जानेवारी २०1४)
यांना ११व्या पुण्यस्मरणानिमित्त
भावपूर्ण आदरांजली !
आपले विनीत: सुरेश पाटील (जासई, ता. उरण)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com